
# इराक

## ( दोन अंकी नाटक )

### चं. प्र. देशपांडे



# इराक

**( दोन अंकी नाटक )**

**-- चं.प्र.देशपांडे.**

( गायकर आणि गावकर हे सुमारे पन्नाशीतले दोघेजण प्रवेश करतात.)

गायकर: या गावकर.

गावकर : बोला गायकर.

गायकर : माझा गोहत्याबंदीला पाठिंबा आहे म्हणून मी गायकर.

गावकर : मी गावाकडच्या गोष्टींना महत्त्व देणारा देशीवादी म्हणून मी गावकर.

गायकर : शिवाय माझा जागतिकीकरणालाही पाठिंबा आहे.

गावकर : आणि माझा त्याला विरोध आहे.

गायकर : परकीय भांडवल जेवढं जास्त येईल तेवढे उद्योग वाढतील -- भरभराट होईल. ही भरभराट झिरपत झिरपत तळागाळापर्यंत जाईलच.

गावकर : इथले उद्योगधंदे बंद पाडून बेकारी वाढवणारी भरभराट !

गायकर : अहो, इथं कर्मचारी स्वस्त, बाजारपेठ मोठी, म्हणून तर येणार ना परकीय भांडवल । उलट बेकारी कमी होईल !

गावकर : आधुनिक तंत्रज्ञानामुळं कामांसाठी माणसांची गरज कमी झालीय गायकर ! शिक्षण महाग होईल, औषधोपचार महाग होतील -- गरीबांना वाली राहणार नाही !

गायकर : शिवाय आपण बुध्दिमानही आहोत ! गेल्या पाच वर्षांत आपण चार हजार पेटंटसाठी अर्ज केलेत ! आपण काही नुसतेच स्वस्त मजूरांचे पुरवठादार राहणार नाही !

गावकर : भांडवलदारी, खुला व्यापार ही काही थोड्या लोकांच्या फायद्याची तत्त्वज्ञानं आहेत !

गायकर : दुसरा काही पर्याय होता का?

गावकर : का नव्हता?

गायकर : गॅट करारात सामील होऊन जागतिकीकरणाला वाव न देणं म्हणजे -- उत्पादनात मागे पडणं, व्यापारात मागे पडणं - जगाच्या व्यापारात आपला फक्त अर्धा टक्का हिस्सा आहे -- तो वाढायला हवाय की नकोय? शस्त्रास्त्रं मिळणार नाहीत -- प्रगती खुंटेल -- मागासलेले राहाल ! जगाबरोबर चालणं भागच होतं !

गावकर : पण त्याचे दुष्परिणाम टाळायचा विचारही व्हायला हवा होता ! बरं, ते ठीक आहे -- आपण हे सगळं इथं कशासाठी बोलतोय?

गायकर : अरे हो, ते थोडंसं सांगू या ! या नाटकामुळं या नाटकाच्या लेखकाचा एक विक्रम पूर्ण होतोय !

गावकर : हे नाटक आहे 'अर्थ ' या विषयावर ! धर्म, अर्थ, काम, मोक्ष -- या चारही पुरुषार्थांवर नाटकं लिहिणारा हा जगातला एकमेव लेखक आहे !

गायकर : ओळीनं लिहिली नाहीत वाटतं नाटकं? ' अर्थ ' मागे कसं काय राहिलं?

गावकर : विषय अवघड आहे.

गायकर : नेमके प्रश्न तरी त्यातले समजायला हवेत !

गावकर : आता अर्थशास्त्र हा विषय घेतला तर गंमत बघा काय होते -- काहीजण म्हणतात जागतिकीकरण चांगलं आहे -- काहीजण म्हणतात वाईट आहे ! -- म्हणजे किती लवचिक शास्त्र ! झाडावरनं तुटलेलं फळ खाली पडतं हेही सिध्द करणारं आणि ते वर आभाळात जातं असंही सिध्द करणारं ! फारच लवचिक !

गायकर : पण काहीही म्हणा, हा लेखक भारतीय संस्कृतीला महत्त्व देणारा आहे हे नक्की !

गावकर : मला त्या लेखकानं सांगितलं ते असं की एवीतेवी इतर तीन पुरुषार्थ झालेच होते तर हे एक नाटक लिहून चौकडी पूर्णच का करू नये - असा विचार त्यानं केला !

गायकर : हो, पण आले कुठून हे पुरुषार्थ?

गावकर : दुसरं असं की तसं पाहिलं तर आजचा खरा पुरुषार्थ एकच आहे -- तो म्हणजे अर्थ ! बाकीचे पुरुषार्थ दुय्यम आहेत ! त्यामुळंही हे नाटक ल्याह्यला पाहिजेच होतं !

गायकर : बरं, लेखकाच्या या पळवाटा थोड्या मान्य करू -- पण एक सांगा, या विषयातलं काही कळतंय का त्याला? उद्या हा म्हणेल की आता मी रसायनशास्त्रावर नाटक लिहितो !

गावकर : ज्या विषयावर खूप मतभेद शक्य नाहीत असे विषय कलाक्षेत्रात इंटरेस्टिंग होत नाहीत. मानवी मूर्खपणाला खूप वाव असायलाच हवा !

गायकर : तुम्ही काय लेखकाच्या वतीनं बोलताय काय ?

गावकर : आपण म्हणजे अमुक अशी आपली पात्रं नाहीत. आपण ज्या त्या वेळी जे ते असणारे आहोत.

गायकर : बरं ठीक आहे, आता पुढचा भाग सुरू करू. पण मला जरा भीतीच वाटतेय.

गावकर : कसली ?

गायकर : प्रसंग गंभीर आहे !

गावकर : म्हणजे ?

गायकर : नाटकातला सुरुवातीचाच प्रसंग -- गंभीर आहे !

गावकर : हां - म्हणजे विनोदी नाही याची भीती ! मग बरोबर आहे ! असं असेल तर रिस्क नको ! रद्दच करू हे नाटक ! विनोद नाही? चला घरी !

गायकर : नाही, नाही -- काही तरी मार्ग काढू या ! जरा विचार करू या !

गावकर : पुढं तरी आहेत का विनोद? की सगळंच गंभीर?

गायकर : विनोद आहेत हो मधेमधे पण सुरुवात तर पार पडायला हवी ना !

गावकर : मग जाऊं द्या ! एकच उपाय ! हा सुरुवातीचा गंभीर प्रसंगही आपण विनोदी पध्दतीनंच सादर करू ! उगीच रिस्क नको !

गायकर : ही म्हणजे सांस्कृतिक टिंगल होईल !

गावकर : त्याला आता इलाज नाही !

( हे संवाद संपता संपता एक स्टूल आणून ठेवले जाते. त्या स्टुलावर महागडे असे स्पोर्टस् शूज. शिवाय दोनचार खुर्च्या वगैरे मध्यमवर्गीय नेपथ्य. प्रकाश अव्दैत हे सुमारे पंचावन्नचे येऊन बसतात. त्यांच्या पत्नी सरस्वती आणि मोठा मुलगा वेदांग येतात. तिघेही दु:खात आहेत. गावकर आणि गायकर घरात प्रवेश करतात. प्रकाश त्यांना खुणेनेच बसायला सांगतात.)

गायकर : झालं काय पण असं अचानक? तुमच्या परीनं शोधणं झालं सगळं ?

प्रकाश : सगळं झालं ... त्याचे मित्र, आमचे नातेवाईक... सगळं ... त्याच्या मैत्रिणीलाही माहीत नाही... शेवटी पोलीसात तक्रार दिली...

गावकर : नाव काय मुलाचं?

प्रकाश : ओम --

गावकर : नाव काय मुलाचं?

प्रकाश : तेच -- ओम् --

गावकर : हं हं -- मला वाटलं तुम्ही ' ओम् ' म्हणताय नुसतं --

प्रकाश : नावच ते -- मी प्रकाश -- आडनाव अव्दैत --

गावकर : हं हं -- ओम प्रकाश अव्दैत ! -- आणि हे?

प्रकाश : हा मोठा मुलगा -- वेदांग --

गावकर : वेदांग की देवांग?

गायकर : वेदांग हो ! हा विमा कंपनीत आहे !

प्रकाश : लग्नाचा आहे -- मुली बघणंही चालू होतं -- आणि हे घडलं मधेच -- हे बूट पाहीलेत ना? या बुटांचा फोटो छापूनही जाहिरात दिली, की बाबा ये -- हे तुला हवे ते बूट आणलेत --( गायकरना --) साडेतीन हजार रुपयांचे आहेत !

गायकर : हे बूट?

प्रकाश : तर !

वेदांग : लाड नडलेत सगळे !

सरस्वती : आता एकमेकांना दोष नको बाबा ! तो पोर सापडेल हे बघा आधी !

प्रकाश : या बुटांवरनंच झालं सगळं ! हे घ्यायचेच म्हणत होता-- मी म्हणत होतो शक्य नाही -- त्याच दरम्यान, आमचा मेव्हणा-- हिचा भाऊ अनंत -- त्याला पैशांची गरज होती -- म्हणून काही व्यवस्था करून त्याला पाच हजार दिले -- तर याचं म्हणणं काय की ते कसे देता आले? माझ्या बुटांनाच का नाहीत पैसे? काय सांगायचं?

वेदांग : लाड नडलेत सगळे ! अभ्यासाची आवड नसतानाही निव्वळ त्याचा हट्ट म्हणून कॉलेजात घातलं ! मी नको म्हणत होतो !

प्रकाश : हे सगळं त्या टीव्हीमुळं झालं ! आणि वर्तमानपत्रं ! सारख्या जाहिराती ! सारख्या जाहिराती ! विचित्र काळ आलाय ! आता ' पिझ्झा ' हा शब्द तरी माहीत होता का इथं कुणाला? .पण आता? दुसरी मुलं खर्च करतात मग मी एकदा तरी करायला नको? -- असं म्हणून पाचशे रूपये खर्च केले ! पिझ्झासाठी !

वेदांग : आता, कसे आणलेत बूट ते विचारा ना !

प्रकाश : कशाला? मीच सांगतो ! टीव्ही विकला ! साडेपाच हजार आले ! साडेतीनचे हे बूट आणले, त्याच्या मापाचे, आणि दोन शिल्लक आहेत !

वेदांग : त्या दोनांचा काय ठरलाय मार्ग?

प्रकाश : अरे, समज, बूट आणलेत हे कळल्यावर तो आला परत तर आनंदच होईल ना आपल्याला !? मग? पण होणार काय? -- टीव्ही नाही हे त्याच्या लक्षात येणार ! मग तो पुन्हा जातो म्हणणार ! त्यापेक्षा मग हा दोन हजारांचा पहिला हप्ता भरून नवा टीव्ही आणावाच लागेल की नाही? हाच विचार ठेवलाय मी मनात --

वेदांग : अहो पण दरमहा पुढच्या हप्त्यांचा बोजा नाही का वाढणार?

प्रकाश : तू नको त्याची काळजी करूस ! मी समर्थ आहे ! मी बघीन ! काय कमी पडलंय का तुम्हाला?

वेदांग : आता बूट कमी पडल्यामुळंच गेलेत ना चिरंजीव !

सरस्वती : ( रडत -- ) नका रे वाद करू -- तो कसा परत येईल ते बघा आधी --

गायकर : ऐकवत नाही हे ! इतक्या सुसंस्कारित घरात -- हे असं !

गावकर : मला काही बोलावंसं वाटतंय, पण या प्रसंगी तो औचित्यभंग होईल असं वाटतंय ! --

प्रकाश : चला, आपण बाहेर जाऊ --

( प्रकाश, गावकर, गायकर खुर्च्या घेऊन बाहेर येतात. वेदांग, सरस्वती आत जातात.)

गावकर : ठरावीक पगाराव्यतिरिक्त आणखी काही वरकड उत्पन्न आहे तुमचं?

प्रकाश : नाही --

गावकर : तुमचा पगार किती आहे हे घरातल्या लोकांना माहिती आहे?

प्रकाश : कशाला? माझी जबाबदारी आहे ती !

गावकर : त्यांनाही माहिती असायला हवी असं मला वाटतं -- तुमच्या उत्पन्नाला मर्यादा आहे याची --

प्रकाश : हे बघा, एकदा चांगलं वागायचं असं ठरवलं की प्रत्येक वेळी आपल्या मर्यादेत कसं जमणार? आता आमचा मेव्हणा -- मोठ्या आशेनं माझ्याकडे आला -- अहो, माझ्या ओळखी आहेत, मित्र आहेत – मी उभे करू शकतो पैसे --

गावकर : तुमच्या कुवतीबाहेरचा मोठेपणा कशाला घेता? तुम्ही चेहरा असा ठेवता की तुम्ही लाखांचे पोशिंदे आहात -- तुम्हाला सगळया प्रश्नांची उत्तरं माहीत आहेत, पण लोक ऐकत नाहीत म्हणून हे सगळं असं राहिलंय --

प्रकाश : मला बऱ्याच विषयांतलं काही कळत नसल्यामुळं मी गप्पच बसतो, किंवा नुसतं थोडंसं हसतो, त्यामुळं तसं दिसत असेल --

गायकर : पण मग कर्जाचे डोंगर वाढत जातील ना --

प्रकाश : आता वेदांगला नोकरी लागली आहे -- लौकरच ओमही हाताशी येईल -- मग माझ्यावर फारसा बोजा येणार नाही -- फार फार तर काय होईल पीएफग्रॅच्युइटीतनं फेडावं लागेल कर्ज -- ते ठीक आहे -- पण चांगलं तर वागता आलं !

गावकर : तुम्हीच तारणहार म्हणून तुमच्याकडे येणारे सहसा रिक्तहस्तानं जाणार नाहीत तर !

प्रकाश : प्रसंगाला उभं राह्यला नको का, सांगा बरं !

गावकर : असे उभे राहात राहात पुरते बसाल नं पण !

प्रकाश : बरं, चलू का? पोलीस चौकीत जाऊन यायचंय --

गावकर : हं, चला -- ( प्रकाश जातात. हे दोघे पुढे येतात.)

गावकर : इथं जरा एक सूचना देणं आवश्यक आहे -- कधी काय घडलं याचा कालानुरूप आणि ती नेमकी

माणसं कोण होती याचा यापुढे विचार करू नये ही विनंती. या नाटकाचा लेखक इतिहासात जरा कच्चा आहे. सॉरी.

गायकर : बरं ते जाऊं द्या -- विषयाला हात घाला --

गावकर : तर पूर्वी कसं होतं की उत्पादन, पुरवठा आणि किंमत ! आणि आता काय आहे तर वापर, मागणी आणि उपयुक्तता ! उपयुक्तता म्हणजे मुख्यत: वस्तूंपासून मिळणारा आनंद -- सुख ! त्यामुळं आता मागणी निर्माण करण्याला आणि मार्केटिंगलाही महत्त्व आलं ! अमुक एक गोष्ट हवीच आहे असं तुम्हाला वाटायला लावणं ! पिझ्झा, बूट !

गायकर : पूर्वी कसं होतं की भांडवल अचल आणि कामगार चल ! म्हणजे इथे नाही बाबा काम, दुसरीकडे जा -- लांब जाऊन बघ ! आता तसं नाही - कामगार जिकडे स्वस्तात मिळतील तिकडे भांडवल जाईल ! जागतिकीकरणाचं हे एक सूत्र म्हणजे आपल्याकडची बेकारी कमी व्हायची आशाच नाही तर काय !

गावकर : उद्योगधंदे बंद पडताहेत, औषधोपचार महागणार आहेत, शिक्षणाचंही मार्केटिंग होणार आहे !

गायकर : शब्दकोशाप्रमाणे अर्थशास्त्र म्हणजे वस्तूंचं उत्पादन, वितरण आणि वापर यांची विशेषत: किंमतीच्या संदर्भातली तत्त्वं शोधण्याचं शास्त्र !

गावकर : स्थलकालपरिस्थितीप्रमाणे नवी नवी तत्त्वं सापडत जातात असंही म्हटलंय बाबा एकानं ! सारखी तत्त्वं बदलावी लागणारं शास्त्र !

गायकर : देशाच्या -- जगाच्या अर्थकारणाला काही तरी पध्दत ही असावी लागेलच !

( एका बाजूने पालव येतात आणि दुसऱ्या बाजूने जयवंत येतात. पालव फोन करतात. जयवंत फोन घेतात.)

पालव : जयवंत का?

जयवंत : बोला ! पालव ना !

पालव : कालच आमचा विषय झाला, तुम्ही त्या एखाद्या जुन्या आदिमानवासारखे दिसता हो !

जयवंत : तुमच्यासारखं -- मर्कटमुख दिसण्यापेक्षा आमच्याकडे हे कल्चरली डेव्हलप्ड समजतात !

पालव : दुसऱ्या कुठल्याही डेव्हलपमेंटचा काय उपयोग आहे जयवंत? आम्ही कधीच कुणाचे पाय धरत नाही, प्रश्न सोडवण्यासाठी चर्चांची गुऱ्हाळं लावत नाही !

जयवंत : आमच्या मार्गांना जग अजूनही शांततेचे मार्ग म्हणतं !

पालव : मग? इराकचा प्रश्न सोडवू या -- शांततेनं?

जयवंत : त्या बाबतीत आमचं माहितीच आहे तुम्हाला --

पालव : ' युनोत ठरू द्या !'

जयवंत : तिथलंही तसं समजूनच असतो म्हणा आम्ही ! आमच्याकडची वर्तमानपत्रं इतकी चावट आहेत

तुम्हाला सांगतो -- आदल्या दिवशी प्रेसिडेंट काय म्हणाले ते छापतात आणि दुसऱ्याच दिवशी तेच सगळं अन्नान्न म्हणाले म्हणून छापतात !

पालव : तो चावटपणा नसतो जयवंत ! घडतंच तसं ! सत्य ते सत्यच ना शेवटी !

जयवंत : युनोची अन्नान्न दशा करणारं सत्य ! आमच्या महाराष्ट्रातले लोक अन्नान हा शब्द अन्नान्न असा लिहितात !

त्यांना स्पेलिंग कळवा एकदा नीट !

पालव : फार छोट्या छोट्या गोष्टींत इंटरेस्ट घेत बसता बुवा तुम्ही ! आम्हाला एवढा वेळ नसतो !

जयवंत : सगळं जग चांगलं चालवायची जबाबदारी तुमच्यावर असते ना ! ( हे सर्व संवाद बोलता बोलता ते उठून समोरासमोर येऊन डायरेक्ट संभाषणही करतात.)

पालव : आता इराकनं कुवैतवर आक्रमण करणं आणि तिथल्या भूमीवर आपला अधिकार स्थापन करणं हे आंतर्राष्ट्रीय कायद्याच्या विरुध्द आहे की नाही?

जयवंत : कुवैत तुमचा लाडका ! आणि इराकही लाडकाच होता की ! इराकनं आठ वर्षं इराणशी युध्द केलं -- त्यात लाखो माणसं मेली -- ते कुठल्या कायद्यानं ? पण त्याला तुमचंच प्रोत्साहन होतं -- शस्त्र पुरवठा होता !

पालव : फक्त तुमच्यापाशी ठेवा -- इराकनं सैन्य मागं घेण्याचे काही प्रस्ताव आमच्याकडे पाठवले होते पण ते आम्हाला पोचलेच नाहीत असं समजा ! आपण युनोमधून पाठवलेले प्रस्ताव त्यानं फेटाळले, मग आपण त्याचे प्रस्ताव कशाला विचारात घ्यायचे? आम्ही हल्ला करणार आहे ! त्या एरियात च्यायला हे दादाच व्हायला बघतंय ! सद्दू वेडपट आहे हो ! आमचाच आहे, त्यामुळं त्याची काळजीही घेणार ! पण इराकचं कंबरडं मोडून त्याला विकलांग करावंच लागेल ! पुढे सध्याचे निर्बंधही चालूच राहणार आहेत !

जयवंत : तुमची ती मॉडेल बाई म्हणाली ते आम्ही लक्षात ठेवलंय -- शक्यतो बहुमतानं आणि तसं न जमल्यास आमच्या एकट्याच्या मतानं आम्ही चालणार ! तुम्हालाच खरी समजलीय लोकशाही ! आणि तुमचे प्रेसिडेंट म्हणतातच -- आम्ही म्हणू तेच होईल !

पालव : बराचसा इराक बेचिराख करणार -- सध्या टाईट निर्बंध तर लादलेले आहेतच -- युनोमार्फत -- तुम्हाला माणुसकीचा पुळकाबिळका येऊ देऊ नका -- त्यांना काही पुरवठा करणारं जहाज दिसलं ना कुठं तुमचं तर ( क्षणभरानं -- ) फाडून टाकू ते -- उभं चिरू ! कळतंय ना !

जयवंत : एवढं काही केलंय का आम्ही कधी ! कायदा पाळणारे लोक आहोत आम्ही ! युनो म्हणजे युनो ! आणि

आता  तर तसं म्हटलं तर आम्हीही तुमचे मित्रच म्हणायचे की ! आणि तुमच्या आमच्यात बोलायचं झालं तर, आम्हाला लोक इथं फॅसिस्ट म्हणतात -- त्यामुळं आमच्या बाबतीत तुम्ही जरा सॉफ्ट कॉर्नर ठेवाल  हे गृहीत धरतो !

पालव : अरे म्हणजे प्रत्येक देशातल्या अंतर्गत राजकारणात इंटरेस्ट घेत बसू का काय आम्ही?

जयवंत : या विषयावर खूप पुस्तकं आहेत आता बाजारात ! आता लाजण्यासारखं काय आहे !

पालव : ते आहे म्हणा !

जयवंत : प्रेसिडेंटना नमस्कार सांगा आमचा --

पालव : आणि तुमच्या पंतप्रधानांना आमचा -- ( हे बोलणे चालू असताना पालवच्या बाजूला प्रेसिडेंटचा प्रवेश तर इकडे  पंतप्रधानांचा प्रवेश. ऐकत बसतात.)

जयवंत : आमचे प्रॉब्लेम्स समजून घेत चला -- शंभर कोटींचा देश आहे -- थोडाफार स्वाभिमान ठेवावाच लागेल -- आणि तुमच्यासारखे आम्ही अजून विकसितही नाही, त्यामुळं शक्य तेवढं सगळयांना धरूनही चालावं लागेल --

पालव : अहो आम्हीसुध्दा काय जिथं प्रतिकाराची शक्यता खूप कमी आहे तिकडंच जास्त लक्ष देतो -- तुमच्या बाबतीत तसं अवघड आहे --

जयवंत : बांगला देशाच्या वेळी सोडलंच होतं की -- सेव्हन्थ फ्लीट !

पालव : पण तुमची ती इंदिरा गांधी ! तुमची ती शत्रू होती पण मनातनं मान द्या तिला !

जयवंत : अहो, कसले शत्रू न काय -- बदलत जाणं भाग आहे हे आमच्याही लक्षात येतंच - पण आपण फौजफाटा कसला उभारलाय ते विसरता कसं येईल? हिंदुत्वाचा -- भांडवलवादाचा -- खुल्या व्यापाराचा --

पालव : बरं ठीक आहे, ठेवतो आता -- एवढ्यात येतील प्रसिडेंट -- आणखी काहीजणांशी बोलायचंय --

जयवंत : ठीक आहे -- गुड डे --

पालव : आमचा गुड डे म्हणजे काही लाख लोकांचं मरण निश्चित हो --

जयवंत : तरीही -- ( दोघेही हसतात, फोन ठेवतात. पालव प्रेसिडेंटना आणि जयवंत पंतप्रधानांना झालेल्या संभाषणबाबत सांगत राहतात. इकडे गायकर, गावकर प्रवेश करतात.)

गावकर : तुम्ही म्हणत असता गायकर की स्वाभिमान, अस्मिता, व्देष, सूड या महत्त्वाच्या गोष्टी आहेत. पण त्याची दुसरी बाजू तुम्ही विसरता.

गायकर : कुठली दुसरी बाजू?

गावकर : परकीय गुंतवणुकीच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य नंबर एकवर आणि गुजरात नंबर दोनवर होतं -- गुजरातमध्ये  धार्मिक दंगली झाल्यावर गुजरात गेलं नंबर चारवर -- आंध्रप्रदेश आणि कर्नाटक मधे

घुसले -- बिहारमध्ये कायदा -- सुव्यवस्थेची बोंब आहे हे लक्षात घेऊन तिकडे फारसं लक्षच देत नाहीत परकीय भांडवलदार ! म्हणजे शांतता, कायदा हे असल्याशिवाय प्रगती नाही !

गायकर : दोन्ही गोष्टींचा बॅलन्स सांभाळत चालायचं हो ! कभी खुशी कभी गम !

गावकर : मला एकदा बोलायचंय हिंदुत्ववाद्यांशी -- तुमचे पुढारी असलेल्या --

गायकर : चला की ! ( दोघेही पंतप्रधानांच्या केबिनमध्ये येतात. जयवंत बसलेलेच.)

जयवंत : अरे या, या -- ( पंतप्रधानांना --) पंत हे गायकर बरं का -- महाराष्ट्रात आपलं काम करतात.

पंत : असं काय -- या, या !

गायकर : हे माझे मित्र गावकर -- लेखक आहेत !

पंत : तुम्हीच खरे संस्कृतीचा प्रवाह जिवंत ठेवणारे !

गायकर : पण पंत, आपली मतं यांना पटत नाहीत ! --

पंत : ते ठीक आहे -- आज नसतील पटत --

गावकर : विशेषत: तुमचा हिंदुत्ववाद --

जयवंत : का हो?

गावकर : एक सूचवू का?

पंत : सुचवा हो ! --

गावकर : हिंदुत्ववाद आहे ना, त्याची सुरळी करा आणि --

जयवंत : का? का?

गावकर : अहो ते कमी दुखेल !

पंत : म्हणजे?

गावकर : अहो, इथं जर का धार्मिक दंगली झाल्या आणि समजा बऱ्याच भडकल्या तर काय होईल? साधा अंदाज नाही?

पंत : बोला ना --

गावकर : ते जागतिक हरामखोर सरसावतील लगेच आणि युनोत ठराव करून घुसवतील सैन्य त्यांचं इथं आणि तेव्हा जी जातीधर्माचा भेदभाव न ठेवता सगळयांची मारली जाईल ना - त्याच्यापेक्षा कमी दुखेल म्हणतोय मी - सुरळी !

पंत : ( हसून --) आता हे तुमच्या लक्षात येतं ते आमच्या लक्षात येत नसेल का? हा एवढा मोठा देश चालवायचा म्हणजे खूप समावेशकता लागेल असं बोलायला सुरुवात केलीच आहे ना आम्ही ! हिंदू या शब्दाचा अर्थ भारतीय असा करतो आम्ही !

गावकर : लोकं एवढी च्युत्ती नसतात हो ! स्वत:ला भारतीय म्हणायला इथं सगळेच तयार आहेत पण स्वत:ला

हिंदू म्हणवून घ्यायला काही कोटी लोक तयार नाहीत -- त्याचं काय करायचं?

पंत : गावकर, आम्ही हळूहळू ' भारतीय ' हाच शब्द स्थिर करणार आहे, पण गाडी एका रुळावरून दुसऱ्या रुळावर अशी टुणकन उडी मारून जात नाही -- हळूहळूच जाणार -- शिवाय आपल्या मागं आधीपासून कोण आहेत हे एकदम सोडून देता येत नाही !

गावकर : मग तुमची तत्त्वं तरी कोणती? तुमच्या मागं येणाऱ्यांनी तुम्हाला काय समजावं असं तुम्हाला वाटतं? हिंदुत्ववादी की समावेशक?

जयवंत : निरनिराळं असतं हो -- एकच असं नाही ! आपल्याला सगळे पाहिजेत ! ( गायकर मान डोलवत राहतात -- )

पंत : आणि मग -- नंतर आपण आपल्या संस्कृतीतून वागायचं ! दुसरं कसं वागणार नाहीतरी !?

गावकर : युनोच्या विरुध्द जायची आपली ताकद नाही ना, मग हिंदुत्ववाद विसरा ! दंगली टाळा !

जयवंत : तुम्हाला काय वाटतं, तुमची आम्हाला माहिती नाही? तुम्ही देशीवादाला कशाला पाठिंबा देत असता मग?

गावकर : बरोबर आहे -- पण हिंसेची बीजं नसतात त्यात !

जयवंत : नसतात? अहो, कुठलीही आयडेंटिटी फिक्स करायला गेलं की हिंसेची बीजं आलीच ! तुम्ही देशीवाद म्हणता आम्ही संस्कृतीवाद म्हणतो !

गावकर : माझ्या लेखनामुळं कुठं हिंसा भडकल्याचं ऐकिवात नाही !

जयवंत : अहो मनोवृत्ती तीच होते ना तयार !

पंत : तुम्ही असं करा, चिंतन करा जरा याच्यावर ! पुन्हासुध्दा भेटू आपण ! गायकर, मला आवडलं ! प्रामाणिक आहेत ! आवडलं !

जयवंत : बरं, गावकर, जागतिकीकरणावरही बोलता का तुम्ही? काय विचार तुमचे?

गायकर : ते गरीबांच्या विरोधी आहे, गुलामगिरीकडे नेणारं आहे वगैरे -- या अंगानं बोलतात ते !

पंत : ठीक आहे, त्यांचं त्यांनाही कळेल याचं रहस्य कधीतरी, नाहीतर आपण सांगू ! ओके?।

गायकर : ( उठत -- गावकरांना -- ) चला !

गावकर : माझे मुद्दे तुम्हाला ऐकवायचेच होते एकदा !

पंत : मीही विचार करतो, तुम्हीही करा -- न जाणो कुठंतरी एकाच ठिकाणी पोचू आपण ! छान ! अं ! ( गायकर, गावकर जातात.)

पंत : आता, अजिबात काही तथ्यच नाही असा कुठलाच मुद्दा नसतो हो ! शेवटी निवड महत्त्वाची ! ( हे दृश्य अंधारात जात असताना प्रेसिडेंटच्या दृश्यावर प्रकाश पडत जातो. प्रेसिडेंट आणि पालव बसलेले. सुदाम येतो.)

प्रेसिडेंट : ( पाहून -- ) अरे वा ! सद्दू -- सिद्दी -- सदा -- सुदाम -- ये, ये ! अरे ये ! ( पालव स्मित करताहेत.)

सुदाम : ( बसत -- ) काय विचार काय आहे आता? एवढी वर्षं दोस्ती असून उपयोग काय मग?

प्रेसिडेंट : अरे, बस रे ! आलायस, बस, पाणी पी, दारू मागवू का?

सुदाम : ते ठीक आहे, पण --

प्रेसिडेंट : अरे थांब थांब ! ए, पालव, जरा एक काम कर नं ! मस्कीला पाठव नं जरा - तिला याला बघायचं होतं ! प्लीज ।

पालव : अवश्य ! ( जातात.)

प्रेसिडेंट : एक मिनिट हं -- मस्कीची न् तुझी ओळख करून द्यायचीय -- ( मस्की येते.) हं -- ये --

मस्की : ( सुदामला -- ) सॉरी ! -- ( प्रेसिडेंटना -- ) थँक्यू !

प्रेसिडेंट : अगं, आपला मित्रच आहे तो ! सुदाम ! आणि सुदाम, ही मस्की -- ( शेकहॅन्ड करत सुदाम प्रश्नार्थक --) प्रेयसी रे माझी ! मैत्रीण म्हण ! हिचं वैशिष्ट्य काय माहिती आहे का? प्रसंगी क्रूर होता आलं पाहिजे -- कुणालाही -- असं हिला वाटतं आणि मुख्य म्हणजे तशी माणसं तिला आवडतात !

मस्की : प्रेसिडेंटवर तर माझं प्रेमच आहे !

प्रेसिडेंट : अशा आपल्यासारख्या लोकांबद्दल तिला खूप उत्सुकता वाटते -- म्हणूनच तिला तुला बघायचं होतं -- (सुदाम स्वस्थ. ) मस्की, तुला काही बोलायचं तर बोल ना ! प्रश्न विचार त्याला हवं तर !

मस्की : विचारू का खरंच?

प्रेसिडेंट : अगं विचार, आपलाच आहे तो !

मस्की : सुदाम, तुमची हरकत नसेल तर हं -- हे बघा, तुम्ही तुमच्याच देशातले इतके कुर्द लोक मारलेत, इराण बरोबरच्या तुमच्या युध्दात तुमचे आणि त्यांचे असे खूप म्हणजे दहा लाख लोक मारले गेले -- तर याबद्दल तुम्हाला काय वाटतं?

सुदाम : ( क्षणभरानं -- ) शूर कुणाला म्हणतात? आपल्या न्याय्य हक्कांसाठी जे मरायला--मारायला तयार असतात त्यांना ! आम्ही शूर आहोत !

प्रेसिडेंट : ए, पण तुझ्यामाझ्यात काही नाही बरं का --न्याय्य हक्क -- बिक्क --

मस्की : आपलं काही चुकत असेल असं कधी वाटतं की नाही?

सुदाम : ही शंका तर दडपूनच टाकायची असते ना ! जगणार कसे तुम्ही नाही तर !?

मस्की : अय्या ! करेक्टच हं !

सुदाम : आमची स्वत:ची मुलं मरू शकतात -- आम्ही स्वत: मरू शकतो !

मस्की : खरंच हं -- आता एकच विचारू -- एकच -- शेवटचा प्रश्न --

प्रेसिडेंट : अगं विचार -- आपलाच आहे तो --

मस्की : तुम्ही प्रेसिडेंटना घाबरता?

सुदाम : त्यांच्याच समोर विचारताय?

मस्की : द्यायचं नसेल तर नका द्यू हं उत्तर -- दिलंच पाहिजे असं नाही --

प्रेसिडेंट : ए, नाही नाही, दिलंच पाहिजे -- माझ्या मस्कीला नाराज करायचं नाही --

सुदाम : काही भीती अशा असतात की तिथं शूरपणा चालतो, काही भीतींच्या बाबतीत नाही चालत --

प्रेसिडेंट : आयला, पत्रकार बोलवू काय आमचे? आलायस तसा एक पत्रकार-परिषदच घेऊन टाक --

सुदाम : माझी ही भेट आपल्याआपल्यातच राहील या अटीवरच आलोय मी --

प्रेसिडेंट : हो रे बाबा हो -- डोंट वरी -- हं, मस्की -- पुढे --

सुदाम : आता बास ! मी काही चर्चा करायला आलोय -- एखाद्या उत्साही मुलीला मुलाखत द्यायला नव्हे -- ( मस्कीला --) माफ करा हं -- माझा मूड जरा वेगळा आहे --

प्रेसिडेंट : बरं, जाऊं दे -- बोल, बोल --

सुदाम : फक्त तुमच्याशी बोलायचं आहे --

प्रेसिडेंट : अरे डोंट वरी अबाऊट मस्की -- ती कुठंही असली तरी माझ्या हृदयात कायमच असते --

मस्की : जाऊ का मी? पण मला उत्सुकता आहे -- हरकत नसेल तर --

प्रेसिडेंट : अगं बस -- ( सुदामला -- ) हं, बोल --

सुदाम : माझ्या प्रस्तावांचं काय झालं? मी कुवैतमधून आमचं सैन्य काढून घ्यायला तयार आहे --

प्रेसिडेंट : हं -- तुझे ते प्रस्ताव -- मी अजून पाहिलेले नाहीत ते -- पण पालव म्हणत होता की ते आम्हाला फारसे उपयोगाचे नाहीत -- आम्ही युनोतर्फे पाठवलेले प्रस्ताव तुला कुठे उपयोगी पडले?

सुदाम : इराणबरोबरच्या युध्दाला तुम्ही प्रोत्साहन दिलंत -- साताठ वर्षं ते युध्द चाललं, पण अजून मनासारखं काही झालं नाही -- या प्रकारातल्या हानीचं काय करायचं? ती भरून काढायचा मार्ग नको? शिवाय कुवैतचं आमच्यावर मोठं कर्जही होतं ! ते फेडणंही शक्य नव्हतं ! म्हणूनच मुख्यत: मी कुवैतचं धाडस केलं -- म्हणजे ते करणं भागच होतं -- आणि मी तुम्हाला हे सांगितलं एवढंच नव्हे तर कुवैतनं आमच्या बॉर्डरवरचं तेल चोरलं असं उठवून मी हल्ला करणार आहे हेही सांगितलं तेव्हा तुम्ही म्हणालात की काय योग्य वाटेल ते कर -- यात आमची काही भूमिका नाही -- मी हाही पाठिंबाच धरून चाललो --

प्रेसिडेंट : इराणचं म्हणशील तर तुला आव्हान म्हणावं असं त्यांचंच होतं -- ते तुला कमकुवत करायचं होतं -- आम्हाला तिकडची मुस्लिम क्रांती पसरायला नको होती, हे एक आणि त्या एरियात दादा होण्याच्या प्रयत्नात असलेले तुम्ही दोघेही कमकुवत व्हावेत हीही आमची इच्छा होती -- आपले दोघांचेही हेतू साध्य होणार होते ! तुला त्या क्षेत्रातला दादा होऊ देणं म्हणजे जगाचा तेल-सम्राटच होणार तू ! म्हणजे जगाची अर्थव्यवस्था, तुझ्यासारख्या महत्त्वाकांक्षी हुकूमशाहाच्या ताब्यात ! -- आता तो प्रश्न नाही !

तर ते ठीक आहे -- पण तू एक विसरलास की कुवैतबद्दलची आमची आपुलकी किती घट्ट आहे -- आम्ही त्याच्या रक्षणाला येणारच -- पण संकट यायला तर हवं आधी त्याच्यावर --

सुदाम : माझा काहीतरी फायदा करून द्या, मी तुम्ही म्हणाल तसं ऐकतो --

प्रेसिडेंट : ते ठीक आहे पण --

सुदाम : आता मी एकदम काहीतरी महत्त्वाकांक्षी हुकूमशहा झालोय असं तुम्ही दाखवताय --

प्रेसिडेंट : तूही त्या एरियात दादा कधीच होऊ नयेस अशी आमची इच्छा आहे -- त्याची कायमची व्यवस्था करायची आता आम्हाला संधी आहे --

सुदाम : विश्वासघातच हा ! --

प्रेसिडेंट : विश्वासघात या विषयावर तू न मी काय बोलणार -- हा खेळ आपल्याला टाळता येणारा आहे का? ( मस्कीला मजा वाटतेय.)

सुदाम : बरं, मग काय, तुमचं काय म्हणणं आहे?

प्रेसिडेंट : एक मी तुला आश्वासनच देतो आधी -- नंतरही सत्ता तुझीच राहील हे मी पाहीन -- पण तुझे हात तोडणं, पाय तोडणं, कान कापून टाकणं - एवढं तर करावंच लागेल !--म्हणजे तुझ्या शरीराचे हाल असं नव्हे रे -- एकूण तुझ्या देशाचे ! --

सुदाम : म्हणजे?

प्रेसिडेंट : आम्ही तुझ्यावर हल्ला करणार -- देश तुझा बराचसा बेचिराख करणार -- पुढंही तुझ्या लोकांचे खूप हाल होत राहतील याची काळजी घेणार - पण लीडर तूच हं -- लीडर तूच -- तुझ्या देशाचा लीडर बदलणारे आम्ही कोण? ते तुझे नागरीक बघतील --( क्षणभरानं -- ) सध्याचे निर्बंध चालूच ठेवायचा आमचा इरादा आहे -- सगळया जगालाच ते पाळावे लागतील -- तू कुवैतवर आक्रमण करणं हा आंतर्राष्ट्रीय कायद्याचा भंग आहे -- कुणीही मान्य करेल --

सुदाम : अच्छा ! --

प्रेसिडेंट : आता तुला वाटेल की ही आता आमची महत्त्वाकांक्षा काम करतेय -- बरोबर आहे -- पण लक्षात घे -- एकतर भौगोलिक दृष्ट्याच आमच्यापर्यंत येऊन पोचणं कुणालाही किती अवघड आहे -- त्यात आमची ताकद ! -- आलं ना लक्षात ? इस्त्रायल आमचा लाडका देश तर तू त्याच्या विरोधात पॅलेस्टाईनला पाठिंबा देणार -- अरब राष्ट्रांचं संघटन करायचा प्रयत्न करणार -- खाजगीकरणाला विरोध करणार -- हे सगळं कुणाच्या विरोधात जातंय तुला कळत नाही? ठीक आहे, याला तुझं विचारस्वातंत्र्य म्हणू ! पण या स्वातंत्र्याची किंमत मोजावी लागेल बाबा ! -- पूर्ण पारतंत्र्यात जाणे ही !

सुदाम : बरं, मग काय करायचं?

प्रेसिडेंट : आता तू जा -- आमचं संरक्षण खातं, सेनाधिकारी या सगळयांशी चर्चा झालेली आहे -- आता यात

बदल नाही -- तुला जिवंत ठेवणार हे नक्की -- लीडर तूच -- नंतर पुन्हा शक्ती एकवटायचा प्रयत्न कर हवं तर -- ( क्षणभरानं -- ) वाईट वाटतं -- आरोग्य, शिक्षण, वितरण-व्यवस्था -- सगळयांत इतका प्रगत होत चाललेला देश ! -- कित्येक वर्षं मागे जाल तुम्ही आता -- माझा काही इलाज नाही --

सुदाम : चलतो मग --

प्रेसिडेंट : तुझ्या लोकांना दाखवण्यासाठी आमचा प्रतिकार करणं -- थोडंफार युध्दही करणं -- तुला आवश्यक वाटलं तर जरूर कर -- आम्ही गैरसमज करून घेणार नाही -- आमच्याही सैनिकांना थोडंफार शौर्य दाखवायचा आनंद मिळेल -- अं ! --

सुदाम : बरंय -- ( जातो. मस्की प्रेसिडेंटच्या गळयातच पडते.)

मस्की : केवढे ग्रेट आहात तुम्ही -- आणि नेहमी योग्य तेच निवडणारे ! -- खरंच ! --

( प्रेसिंडेंट तिला हसत हसत कुरवाळत असताना हे दृश्य संपते. गायकर--गावकर येतात.)

गावकर : भांडवलवादाची दोन मुख्य वैशिष्ठ्यं म्हणजे नजीकचे फायदे पाहणं आणि हाव बाळगणं -- यासाठी मग पर्यावरणाचा नाश होणार असेल, ओझोनचं कवच फाटणार असेल आणि त्यामुळं शेवटी सगळी मानवजातच काय पण जीवसृष्टीच नष्ट होण्याची शक्यता असेल तरी भांडवलवाद त्याची चिंता करू शकत नाही --

गायकर : हो, पण काही ना काही सतत मिळवत राहणं हे तर माणसाच्या मनाचंच वैशिष्ठ्य आहे -- पैसाच असं नव्हे -- सत्ता, प्रतिष्ठा, न्याय --

गावकर : मार्क्सनं मानवी जीवनातला मुख्य संघर्ष पकडला -- मालक आणि कामगार -- या संघर्षाच्या ज्ञानावर त्यानं हितकारक अर्थशास्त्र उभारून दाखवलं --

गायकर : तो मुख्य संघर्ष नव्हताच ! -- दडपणारे आणि दडपले जाणारे -- हाच खरं तर मुख्य संघर्ष मानायला हवा -- कारण यांतल्या कुठल्यातरी एका भूमिकेशिवाय माणसाचं जगणंच शक्य दिसत नाही --

गावकर : हे व्हेग बोलणं झालं -- निरुपयोगी ! (दोघेही जातात. आता ओम आणि त्याचे दोन साथीदार येतात. ओमच्या पायांत त्याचे आवडते बूट. उत्तम पोषाख, गॉगल. साथीदार तरुणच पण जरा जास्त अनुभवी. त्याला धीर देणारे.)

१. : भोसडीचा किती वेळ पूजा करत बसलाय --

२. : पण बॉस नाय म्हटला ना --

१. : मंदिरमधे नका जाऊ म्हटला -- बाहेर आल्यावरच बघा म्हटला न फोन बंद केला --

ओम : मला जमायला हवं सगळं --

२ ’ परिंदा ’ बघितला का नाय -- ती ष्टाईल -- हां --

ओम : मी जमवणारच आहे -- मला खत्रूडसारखं नाही जगायचं --

१. : ये हुई ना बात -- पैशाची चिंताच नाही करायची -- नुसता ॲडव्हान्स मिळाला तर किती खरेदी झाली तुझी -- हे बूट, गॉगल -- व्वा ! -- पण आता यापुढे थोडे दिवस हा पोषाख बंद हां -- लफडा नको -- याच्यामुळं सापडशील नाहीतर ! --

२. : ए, आला तो -- उसके साथ और एक आदमी है --

१. : ओम तू इथंच थांब -- ( २ ला -- ) त्या दुसऱ्याला तू बाजूला कर -- मी त्या च्यूत्याला घेतो पुढं -- ( १ आणि २ जातात . )

१. : तू ये इकडे - चल - काय दोनदोन तास पूजा करतो काय भडव्या - किती वेळ वाट पाहायची - (तो संबंधित उद्योगपतीला घेऊन पुढे येतो. उद्योगपती सिल्कचा झब्बा-पायजमा घातलेला, गंध, कंकू-टिळा लावलेला.)

उद्योगपती: कोण आहात तुम्ही? हे काय आहे?

१. : देवाकडं मागणी फार बाबा तुझी -- थोडं काही आमच्याकडनं पण घे ना -- ( ओमला --) ओम -- शांती ! -- ( ओम पुढे होतो. उद्योगपतीच्या मस्तकात गोळया झाडतो. उद्योगपती कोसळतो.)

२. : ( आवाज -- ) देखता क्या है च्यूते - भाग -- नही तो तू भी मरेगा - ( तो दुसरा माणूस पळाल्याचा आवाज मग २ पुढे येतो -- ) चलो -- भागो -- ( १ तो उद्योगपती मेल्याची खात्री करून घेतो -- तरीही आणखी एक गोळी झाडतो. )

१. : चल मेरे ओम -- हो गई अब तेरी एन्ट्री -- इसके आगे जितना काम करेगा उतनी बुलंदियाँ तेरे पाँव चूमेंगी --

ओम : झालं बरोबर --

१. : चल -- चिंता मत कर --

२. : चलो - भागो -( तिघेही जातात. क्षणभरानं ' यार दिलदार तुझे कैसा चाहिये ...प्यार चाहिये या पैसा चाहिये ' ... हे गाणे सुरू होते. रंगमंचावरून निरनिराळया जाहिरातींची चित्रे जात राहतात. टीव्ही, फ्रिझ, मोटारसायकल, सौंदर्यप्रसाधने, कार, अंडरवेअर्स, ब्रेसिअर्स, बिल्डिंग, दारू, सिगरेट, मोबाईल, इत्यादी... नंतर एका बाजूने प्रिया प्रवेश करते आणि एका बाजूने ओम प्रवेश करतो. ओमने बूट आणि गॉगल काढलेले. )

ओम : ( जणू घाईत असल्याप्रमाणे -- ) प्रिया, एक मिनिट थांब -- मी काय सांगतोय ते ऐक -- मला एक मस्त नोकरी लागलीय -- पगारही चांगला आहे -- बिझिनेसच समज -- आता काहीच प्रॉब्लेम नाही --

प्रिया : होतास कुठे पण तू इतके दिवस? तुझ्या घरचे लोकही काळजीत आहेत -- कसली नोकरी? साधा फोनही केला नाहीस !

ओम : ते सगळं सांगणारच आहे मी तुला -- पण आता आहेस तशी चल -- तुझ्यामाझ्यात मोठ्या माणसांचे

अडथळे नकोत --

प्रिया : अडथळे कसले?

ओम : हेच -- चौकशा, चर्चा, मतं, विरोध -- हे काही नको -- माझ्याबरोबर चल -- आपण लग्न करू या -- आपण दोघंही योग्य वयाच्या वर आहोत.

प्रिया : आणि नसतो तर?

ओम : नसतो तरी काही नाही -- पण आपोआपच पाळता येतोय हा कायदा --

प्रिया : घर, भांडीकुंडी, कपडे यांचं काय करणार?

ओम : तुझा माझ्यावर विश्वास आहे की नाही? मी सांगतोय ना -- आता कसलीच काळजी नाही --

प्रिया : पण --

ओम : ऐक -- तुम्हारे लिए मै जान दे भी सकता हूँ -- और किसी की जान ले भी सकता हूँ --

प्रिया : खरंच की डायलॉग नुसता?

ओम : खरं -- सच्ची ! दिलसे ! तुझ्याशिवाय मला काही सुचत नाही -- तू, तू आणि तू -- बास --

प्रिया : ' सच्ची ' ? ( दोघेही हसतात -- )

ओम : तुझी शपथ ।

प्रिया : माझंही तसंच आहे रे माझ्या राजा --

ओम : चल मग --

प्रिया : पण --

ओम : अगं चल -- ( तो तिला ओढतच घेऊन जातो. तिचा विरोध मावळलेला. आता ओमच्या घरातले दृश्य. वेदांग पेपर चाळत बसलेला. प्रकाश सिगरेट फुंकत विचारात बसून. सरस्वती येते.)

सरस्वती : अहो, ऐकलंत का? प्रियाही बेपत्ता झालीय म्हणे !

प्रकाश : कोण?

सरस्वती : प्रिया ! ओमची मैत्रीण !

प्रकाश : त्याचा आपल्याला काय फायदा?

सरस्वती : फायदा नव्हे, पण, मला एक आपलं वाटतं, ती ओमबरोबरच तर नसेल गेली पळून? !

प्रकाश : ओम बराच आधी गेलाय !

सरस्वती : म्हणजे नंतर हो !

वेदांग : असेल ! तसंही असेल ! त्या दोघांचं झालं असेल तिकडं अव्दैत आणि मी बसलोय इथं - एकटा ! काही दोष नसताना !

सरस्वती : अरे पण त्याचाही पत्ता लागला तर बरंच होईल ना ! मला आपलं वाटलं की कळेल काहीतरी या

निमित्तानं !

प्रकाश : तुला कुणी सांगितलं -- हे प्रियाचं?

सरस्वती : शेजाऱ्यांच्या मोलकरणीनं -- शाल्मलीनं !

प्रकाश : शाल्मली?

सरस्वती : तीच हो ! तिनं सांगितलं ! माहिती करेक्ट आहे !

प्रकाश : मोलकरणी म्हणजे लोकल वर्तमानपत्रंच साली !

वेदांग : सगळे आपलं आपलं साधून घेतात नालायक ! कुणाला कुणाची फिकीर नाही ! आता त्या मूर्खामुळं आला की नाही निष्कारण कलंक !

सरस्वती : कलंकबिलंक काही नाही -- तो सापडला की सगळं ठीक होईल !

वेदांग : नाही कसं? एका मुलीच्या आईनं काकूकडे काय चौकशी केली? आपल्या घराण्यात पूर्वी आणखी कुणी पळून गेलं होतं का? याचा अर्थ काय होतो? पळून जाण्याच्या पेशी आनुवंशिक पध्दतीनं आपल्या मेंदूतच तर नसतील अशी शंका घेतात लोक ! ( सरस्वतीला -- ) तुझंही घराणं तपासावं लागेल ! न जाणो तिकडूनही आला असेल हा रोग ! लग्न न होण्यासाठी दिलेलं प्रेझेंट !

प्रकाश : डोक्यात राख घालू नकोस उगीच !

वेदांग : उगीच कसं?

सरस्वती : मी आपलं ओमबद्दल आशा वाटली म्हणून कळल्याकळल्या सांगायला आले --

वेदांग : माझी आशा दे सोडून तू !

प्रकाश : तसं म्हणतेय का ती?

वेदांग : आता नोकरी आहे, सगळं आहे -- माझ्या बरोबरीच्या मुलांच्या लग्नांना जाऊन नुसता अक्षता टाकून येतोय मी ! कारण काय तर धाकटा भाऊ पळून का गेलाय? ।

प्रकाश : अरे तू काय नुसता तुझाच विचार करतोयस काय? त्याची काहीच काळजी नाही?

वेदांग : तुम्ही दोघं करताय की त्याची काळजी ! माझीच कुणाला काळजी नाहीय !

सरस्वती : ( रडत -- ) नाही कसं रे? दोन्ही आमचीच मुलं आहात ना तुम्ही? तुझ्याबद्दल नाही कसं?

वेदांग : ते येडं पळून गेल्यापासून या रडारडीचा एक वैताग आलाय अगदी !

प्रकाश : अरे मग तू कारण नको देऊस ना रडारडीला !

वेदांग : मीच ! पुन्हा मीच !

प्रकाश : येत्या फेब्रुवारीपर्यंत तुझं लग्न जुळेल म्हणून तीन ज्योतिषांनी सांगितलंय !

वेदांग : एक वर्षाच्या आत ओमचा ठावठिकाणा कळेल असंही त्याच ज्योतिषांनी सांगितलंय ! का काळजी करता मग त्याची ?

प्रकाश : आता मुली बघण्यापूर्वी नेहमीप्रमाणे पत्रिका जुळतात की नाही हे तर बघायचंच पण ओम पळून गेलाय याची आधीच कल्पना द्यायची असा माझा विचार आहे -- म्हणजे नंतर मग या कारणानं नकार नको --

वेदांग : म्हणजे आता मुली बघणंही बंद होईल !

सरस्वती : असं नाही रे होणार -- परमेश्वराच्या इच्छेबरोबर तर चालावंच लागेल ना !

वेदांग : परमेश्वराची इच्छा ! ( इथे हे दृश्य संपते. गायकर, गावकर येतात.)

गावकर : पूर्वी स्मिथ नावाचा एक अर्थशास्त्रज्ञ होऊन गेला. तो म्हणत असे की कौटुंबिक लेव्हलवर लागणारा धोरणीपणा आणि दूरदृष्टी आणि राज्याच्या लेव्हलवर लागणारा धोरणीपणा आणि दूरदृष्टी यांत काही फरक नसतो .

गायकर : आपल्याच निरनिराळया संबंधांतले संघर्ष आणि देशादेशांतले संघर्ष हेही सारखेच असतात ना !

गावकर : अर्थशास्त्रात, अलिकडच्या काळात शोध लागलेलं ' अनिश्चितता ' हे तत्त्व मला फार महत्त्वाचं वाटतं ! स्टेशनरी स्टेट कॅन्सेप्ट म्हणजे बदलविरहित परिस्थिती ही संकल्पना मोडीत निघालेली आहे !

गायकर : त्यामुळं काय होईल?

गावकर : विचार करून बघा नं -- इराकमधले अर्थशास्त्रज्ञ आता कसा करतील आर्थिक विचार ! -- हे निर्बंध आणि लौकरच होणारे हल्ले या पार्श्वभूमीवर ! ( दोघेही जातात. एका बाजूने जयवंत आणि दुसरीकडून पालव येतात. जयवंत फोन करतात.)

पालव : ( फोन घेऊन -- ) हॅलो -- हो -- पालव -- हां -- बोला, बोला जयवंत ! तुम्ही फारच तुमच्याकडच्या एखाद्या आदिमानवासारखे दिसता हो --

जयवंत : तुमच्यासारखं मर्कटमुख दिसण्यापेक्षा हे माझं कल्चरली जास्त डेव्हलप्ड समजतात इकडे --

पालव : बरं ते जाऊं दे, अयोध्येच्या राममंदिराचं कुठपर्यंत आलं? आराखडाही दाखवत होता तुम्ही?

जयवंत : आता सध्या तो विषय काढायचा नाही -- आम्ही एनडीए चा अजेंडा स्वीकारलेला आहे -- त्याप्रमाणेच काम होणार --

पालव : म्हणजे नैतिकताही झाली आणि शिवाय आपल्या मनात तेच आहे हे सुचवणंही झालं --

जयवंत : आमच्याकडं एक म्हण आहे की वाघावर एकवेळ स्वार होता येईल पण उतरणं अवघड असतं --

पालव : उतरलं की तुम्हालाच खाऊन टाकेल तो याअर्थी !?

जयवंत : तुमच्या हुशारीबद्दल मला कधीच शंका नव्हती !

पालव : पण वर्षानुवर्षं तुमच्या रक्तामासात भिनलेली गोष्ट तुम्ही सोडायला तयार आहात हे विशेषच आहे !

जयवंत : दु:खावर डागण्या देणं हे काही मैत्रीचं लक्षण नव्हे --

पालव : सॉरी, सॉरी -- पण पुन्हा निवडणुका आल्यावर काय करणार?

जयवंत : सगळं सांगू काय तुम्हाला? याच्यावर खूप विचारमंथन झालेलं आहे ! ' रथयात्रा ' हा शब्द तोच असेल

-- आमच्या बऱ्याच लोकांना आवडणारा -- पण आता राममंदिर हा मुद्दा असणार नाही -- निवडणुकीतसुध्दा अजेंडा एनडीएचाच -- म्हणजे युतीशी आम्ही एकनिष्ठ आहोत असं -- म्हणजे पुन्हा मनात राममंदिरही आहे असं सुचवणं पण तो मुद्दा सोडून दिलेला आहे असं दाखवणं -- म्हणजे दोन्ही प्रकारची मतं मिळावी हा प्रयत्न --

पालव : सत्तेवर आल्याशिवाय देशाचं भलं करता येत नाही हाच याच्यामागे विचार असणार !

जयवंत : तुमच्यासारखंच !

पालव : किंवा तुमच्या त्या काँग्रेससारखं म्हणा ! पण त्यांना तुम्ही सत्तालोभी म्हणत होता !

जयवंत : कशाला चिमटे काढताय? जरा मोठ्या जबाबदाऱ्या पडल्यावर थोडी मॅच्युरिटी येतेच की !

पालव : पण तुमच्या सवयी अजून त्याच चालू दिसतायत -- कुत्सित, उपरोधिक बोलणं -- विरोधी पक्षात असल्यासारखं ओरडणं, कांगावा करणं -- एकदा सिंहासनावर बसल्यावर या सवयी --

जयवंत : जातील हो हळूहळू -- आम्ही टिकलो पाहिजे आणि बहुतेक टिकूच -- त्यांच्याकडे नेतृत्व नाहीय --

पालव : त्यांच्या कमकुवतपणावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वत:च्या कर्तृत्वावर विश्वास ठेवा की !

जयवंत : दोन्ही करायचं ! आनंद कमी कशाला करायचा !

पालव : आम्हालाही तुम्हीच टिकावं असंच वाटतंय - तुम्ही सुधारणा खूप वेगात करताय -- व्यापार खूप वाढेल -- तुमचा -- आमचा -- आमचे बरेच लोकही तिकडे यायला उत्सुक आहेत -- काळजी घ्या पण त्यांची -- योग्य ते संरक्षण द्या -- आणि खाबूगिरी मापात ठेवा -- एकदा तुम्ही -- एकदा ते -- असं नको --

जयवंत : तुम्ही कधीही आमच्याहून जास्त मॅच्युअर !

पालव : ते ठीक आहे --

जयवंत : बरं, इराकचं कुठवर आलंय? आम्हाला तर वाटतंय की नुसत्या निर्बंधांनीच काम होईल --

पालव : तसं नाही जयवंत, दुसरे काही प्रयत्न करायचीही शक्ती नष्ट करायला हवी त्यांची --

जयवंत : म्हणजे?

पालव : तुम्ही आमच्या विश्वासातले म्हणून सांगतोय -- फार मोठा प्लॅन आहे --

जयवंत : म्हणजे?

पालव : सुमारे नव्वद हजार टन एवढे बॉम्ब टाकले जातील ! स्मार्ट बॉम्ब !

जयवंत : बाप रे !

पालव : म्हणजे एकूण विनाशाची शक्ती -- हिरोशिमावर टाकलेल्या अणुबाँबच्या सहापट धरून चला --

जयवंत : आयला, राहणार काय पण तिकडे मग? आणि अचूक वेध घेणारे स्मार्ट बॉम्ब असल्यावर इतके कशाला लागतील?

पालव : काहींची लक्ष्यं चुकतील हो ! हॉस्पिटलवर, शाळेवर असे पडून थोडेतरी वाया जाणारच की !

जयवंत : हॉरिबल !

पालव : दळणवळण आणि वीजयंत्रणा खलास करायची !

जयवंत : लाखांनी माणसं मरतील !

पालव : युनोच्या पाठिंब्यानं होणार आहे सगळं ! तसं नाही होऊ शकलं तरी हे होणारच !

जयवंत : च्यायला, दोन कोटींचा तर देश --

पालव : पण महत्त्वाकांक्षा केवढी ! जगाला वेठीला धरायची ! हे सगळं आम्ही करतोय ते नशीब समजा ! कोण करू शकतंय नाहीतर हे काम? तेल ही त्यांची नैसर्गिक संपत्ती आहे हे मान्य पण त्याच्या जोरावर हे जगाचे सम्राट व्हायला चालले !

जयवंत : या निमित्तानं तुमचाही कंट्रोल वाढेल एकूणच तेलावर !

पालव : ते आहे म्हणा ! बाकी काय अजून?

जयवंत : एक आहे पण -- काही लोक जे म्हणतात ना की युध्द, महत्त्वाकांक्षा, दुटप्पीपणा हे टाळून माणसाला जगता आलं तर सगळयाच माणसांना चांगलं जगता येईल -- त्यात काही तथ्य नाही हेच खरं --

पालव : परिपक्वता हो, परिपक्वता बोलतेय हे --

जयवंत : पण याच परिपक्वतेनं आम्ही आमच्या शेजारच्या देशाशी असलेले आमचे प्रश्न सोडवू इच्छितो तर तुम्ही त्याला मोडता घालता --

पालव : नाही, नाही, असं नाही ! ती तुमचीच परिपक्वता ! कुवैत आमचा लाडका आहे हे इराकला कळलं नाही पण तुम्हाला काही गोष्टी कळतात ! ते म्हणजे तुमचे शेजारी आमच्यासाठी काय करतात हेही लक्षात घ्यावं लागतं !

जयवंत : आमचं काय मग?

पालव : तुम्हीही मित्रच की आमचे ! तुम्ही आमची मध्यस्थी नको म्हणता -- राहिलं -- आग्रह धरलाय कधी?

जयवंत : बरं, हे झालं सगळं -- मी फोन करायचं कारण जरा वेगळं आहे --

पालव : बोला --

जयवंत : तुम्हाला सगळ्या जगाची कामं पडलीयत याची मला जाणीव आहे -- तरीही --

पालव : बोला, बोला --

जयवंत : आमच्या इथल्या एका मराठी लेखकाला तुमच्या प्रेसिडेंटना भेटायचंय --

पालव : कशाला? काही देवाणघेवाण असल्याशिवाय प्रेसिडेंट कुणाला भेटत नाहीत -- ' फायदा काय ' -- हा त्यांचा पहिला प्रश्न असतो --

जयवंत : काही नाही, माझ्यासाठी जमवा एवढं -- आमच्या एका माणसाबरोबर पाठवतोय -- बाकीचे तपशील घेतो मी ठरवून तुमच्या ऑफीसकडून --

पालव : प्रभाव कितपत आहे?

जयवंत : तो काहीच प्रश्न नाही -- विरोधकांनाही आम्ही त्यांच्या मनाप्रमाणे संधी देतो -- हे करायचंय --

पालव : फक्त पाच मिनिटं -- पण पुन्हा कृपया असली गळ घालू नका -- अमेरिकेतल्या कलाकारांसाठीसुध्दा ते फारसा वेळ घालवत नाहीत -- आपली लोकशाही आहे -- त्यांना त्यांचं काम करू द्या -- इतकंच म्हणतात -- ( क्षणभरानं -- ) आपल्याला त्यांनी खूप वाईट, क्रूर म्हटलं तरी चालेल -- त्यानं दहशतच वाढेल आपली -- असं म्हणतात -- आपल्या लोकशाहीचा हा एक फायदाच आहे -- असं ते म्हणतात -

जयवंत : इतकं काही नाही -- पण देतो पाठवून --

पालव : हं, अच्छा !

जयवंत : अच्छा, गुड डे !

पालव : आमचा गुड डे म्हणजे किमान काही लाखांचं मरण हो !

जयवंत : ( हसत -- ) अच्छा, ठेवतो -- ( फोन ठेवतात. पालवही फोन ठेवतात. तोपर्यंत प्रेसिडेंट येऊन बसलेले.)

पालव : जयवंतची एक रिक्वेस्ट मी मान्य केलीय -- तिकडचा एक मराठी लेखक आहे -- जयवंतचा एक माणूस त्याला घेऊन येईल -- फक्त पाच मिनिटं तुम्ही त्याला भेटायचंय --

प्रेसिडेंट : कशाला रे? फायदा काय?

पालव : त्याला जाणून घ्यायचंय काही तुमच्याकडून --

प्रेसिडेंट : अरे इथं लाखांच्या जगण्यामरण्याचे प्रश्न चाललेत आणि काय हे --

पालव : असूं दे -- आता तर डेडलाईन तारीखही देऊन झालीय इराकला -- त्यावेळी काय करायचं याही सगळया सूचना देऊन झाल्यायत -- डेडलाईनच्या शेवटच्या तारखेलाच बोलवतो -- त्या शेवटच्या दिवशी आपल्याला काहीच काम नसेल -- आपण सांगितलेली नुकसानभरपाई कुवैतला देऊन माघार घेणं सुदामला मान्य होणं शक्यच नाही --

प्रेसिडेंट : बरं, बोलाव -- पाचच मिनिटं हं पण --

पालव : ( जरा मोठ्या आवाजात -- ) चला, या गायकर -- गावकर -- प्लीज कम इन -- (गायकर - गावकर येतात. ) या, या ! बसा। ( दोघेही बसतात.)

दोघेही : नमस्कार !

प्रेसिडेंट : गुड इव्हिनिंग -- हं -- बोला -- बरं, पालव, यांना काही चहापाणी, दारू -- झालंय?

पालव : आपले पाहुणे म्हणतायत, आपली दारू ही श्रीमंतांची दारू आहे -- ती नकोय त्यांना --

प्रेसिडेंट : बरं मग?

पालव : त्यांच्यासाठी इंडियातनं खास मी ' मोसंबी ' नावाची दारू मागवून ठेवलेली आहे -- आता ती इथं आणेपर्यंतचा खर्च पाहता आता ती इथल्या दारूहूनही आपल्याला महाग पडलीय हा भाग वेगळा --

प्रेसिडेंट : ते असू दे -- ठीक आहे -- हं -- बोला --

गावकर : तुमची सगळी धोरणं ही गरीबांना अधिक गरीब करणारी आणि त्यांचं जगणं मुश्किल करणारी आहेत -- याबाबत तुमची भूमिका काय?

प्रेसिडेंट : पालव, हे इंटरेस्टिंग आहे -- जरा, प्लीज, मस्कीला द्या ना पाठवून -- आवडेल हे तिला --

पालव : ( उठून जात -- ) पाठवतो -- ( जातात.)

प्रेसिडेंट : एक मिनिट हं -- मस्की येऊ द्या -- हे मिनिट मी माझं देतोय तुम्हाला -- तुमचं खर्च करत नाहीय -- (मस्की येते.) हं, मस्की, बस, बस -- हे भारतातले एक मराठी लेखक आहेत -- गरीबांच्या बाबतीत माझी भूमिका काय ते विचारायला आलेत --

मस्की : अय्या ! हाऊ इंटरेस्टिंग ! ( हसते. बसते --)

प्रेसिडेंट : तर मिस्टर गावकर, आमच्या देशातही गरीब लोक आहेत, त्यांच्या वस्त्या -- स्लम्स आहेत. या लोकांचं नफा कमावण्यात काहीही योगदान नसतं म्हणून आम्ही त्यांना सुपरफ्ल्युअस म्हणजे बांडगुळं म्हणतो -- याच्यावर उपाय करणं भाग असतं -- त्यासाठी आमची ड्रग कंट्रोल पॉलिसी म्हणजे मादक द्रव्यांना आळा घालणारे कायदे उपयोगी पडतात. यांतल्या बऱ्याच लोकांकडे मारिजुआना हे मादक द्रव्य सापडतं -- स्वत:साठी किंवा किरकोळ विक्रीसाठी -- हे त्यांच्याकडे असतं -- त्या गुन्ह्याखाली आम्ही त्यांना पकडतो आणि तुरुंगात टाकतो. आमच्याकडे सुमारे वीस लाख लोक तुरुंगात आहेत हे मी तुम्हाला सांगू शकतो. आता यांतले बहुसंख्य लोक काळे आहेत हा काही माझा गुन्हा नाही. काही लोक म्हणतात की हा एक वर्णभेदाचाच प्रकार आहे -- मी म्हणतो की हे खोटं आहे ! -- दुसरं असं की काही लोक विचारतात की हेच मादक द्रव्य निरनिराळे बँक ऑफिसर्स, कंपन्यांचे मालक यांच्याकडेही असतं की नाही, मग त्यांना का नाही पकडत? उत्तर सरळ आहे -- ते नफा कमावण्यात योगदान देणारे असतात म्हणून ! आता काही लोक असंही म्हणतात की मारिजुआना हे द्रव्य अल्कोहोलपेक्षा म्हणजे दारूपेक्षा खूपच कमी घातक आहे आणि सिगरेटएवढं घातक तर काहीच नाही, मग आम्ही सिगरेट कशी चालू देतो? उत्तर सरळ आहे ! सिगरेटचा व्यापार अब्जावधी डॉलर्सचा आहे -- तो कसा बंद करता येईल ? आमची आर्थिक घडी सगळी विस्कटून टाकावी का आम्ही? आता परवाच आम्ही चीनलाही ठणकावलं -- म्हटलं आमच्या सिगरेटच्या जाहिराती चीनमध्ये दिलखुलासपणे करू द्यायच्या -- नाहीतर तुमच्या निर्यातीचं काय करायचं ते आम्हीही बघू -- मान्य केलं त्यांनी -- त्यांच्याकडेही शहाणपण असतंच की -- आपला फक्त त्याच्यावर विश्वास पाहिजे --

मस्की : अय्या । मलाही माहीत नव्हतं हे सगळं -- थोडक्यात पण किती मुद्देसूद ! -- खरंच ! --

प्रेसिडेंट : आणि आमच्या तुरुंगांमध्ये कैद्यांचा अतोनात छळ होतो असा आरोप करतात काहीजण -- अहो आम्हालाही मानवी हक्कांचं शिकवतात काही लोक ! बोला आता !

गावकर : जगातल्या प्रत्येक माणसाला चांगलं जगण्याचा अधिकार असायला हवा असं नाही वाटत तुम्हाला?

प्रेसिडेंट : वाटतं ! पण कसं शक्य होणार -- सांगा ! आता इराकला वाटलं की तोच होईल दादा, मग आम्ही काय करायचं -- होऊ द्यायचं तसं? आणि त्यांचाही दोष नाही -- स्वत:साठी, स्वत:च्या देशासाठी जास्तीत जास्त मिळवत राहणं -- कमवत राहणं हा तर मनुष्य स्वभावच आहे ! हे नाकारून धोरणं कसली ठरवणार?

गावकर : हा निराशावादी विचार नाही? -- जगात चांगले बदल होत आलेत ते न्यायाच्या चळवळींमुळे – विषमते विरोधातल्या कृतींमुळे, हे तुम्ही नाकारता?

प्रेसिडेंट : नाही, नाकारत नाही -- पण हे सगळे बदल लक्षात घेऊन कुठल्याही क्षणी जर जगाची परिस्थिती तपासली तर काय दिसतं? एकंदरीत अन्यायांचं प्रमाण आणि तीव्रता कमी झालीय असं दिसतं? की वाढलीय?

गावकर : तुम्ही -- राज्यकर्त्यांनी -- हितकारक भूमिका घ्यायला हवी --

प्रेसिडेंट : आमचं काय ते आम्ही सांगितलं -- तुमचं सांगा --

गावकर : आम्ही चळवळी करत राहू -- झटत राहू -- यातूनच मानवजात चांगलं जगण्याकडे जाईल -- हा विश्वास आहे आमचा !

प्रेसिडेंट : ( उठून, गावकर - गायकरना जरा बाजूला बोलावत -- ) इकडे या जरा -- ( ते जातात --) मस्कीसमोर नको म्हणून -- हं -- तर तुम्ही ज्या काही चळवळी आणि प्रयत्न करताय नं ते एकूणच मानवजातीच्या संदर्भात कसे आहेत ते सांगू का --

गायकर : सांगा ना --

प्रेसिडेंट : हत्तीच्या गांडीत उदबत्तीची काडी -- असे ! दुखायचा तर प्रश्नच नाही -- जाणवणारही नाही !

गायकर : आमच्याकडच्या देशीवादाला तुमचाही पाठिंबा दिसतोय प्रेसिडेंट ! भाषाच सांगतेय !

प्रेसिडेंट : या आता इकडे ! ( पुन्हा मूळ जागी जातात.)

मस्की : मी एक प्रश्न विचारू का यांना?

प्रेसिडेंट : अगं विचार -- खरं तर यांची पाच मिनिटं संपलीयत -- पण तुझ्यासाठी -- विचार --

मस्की : ( गावकरना -- ) मिस्टर गावकर तुम्हाला असं तर वाटत नाही की आजिबातच क्रूरपणा नाही असा माणूस असू शकेल? मग तर मला माझ्या सगळया आवडीनिवडीच बदलाव्या लागतील !

गावकर : मी सामाजिक न्यायाचं बोलतोय !

मस्की : तेच ! क्रूरपणाच नाही अशी माणसं असल्याशिवाय असा समाज कुठला असणार?

प्रेसिडेंट : ( मस्कीला चापट मारून --) आयला, फिलॉसॉफरच झालीस की तू मस्की -- ( हसतात -- )

पालव : ( घाईघाईने प्रवेश करत -- ) प्रेसिडेंट ते जाऊ द्या आता सगळं ! -- डेडलाईन संपली आहे -- बॉम्बिंग

सुरू झालंय -- लाईव्ह टेलेकास्ट सुरू करतो -- ( रिमोटने टीव्ही चालू करतात. बॉम्बिंगचे आवाज... आवाज वाढत जातात... सगळे बघताहेत... गावकर फारच व्यथित ... )

**-- अंक पहिला समाप्त --**

**-- अंक दुसरा --**

( गायकर, गावकर येतात.)

गायकर : मला एक सांगा, या एकूण प्रकारात हुक कुठाय?

गावकर : हुक?

गायकर : प्रेक्षकांना अडकवून ठेवण्यासाठी एक उत्सुकतेचा ताणलेला धागा ठेवायची पध्दत असते.

गावकर : हां, हां -- तो हुक? -- तो नाही आला का !?

गायकर : कुठाय?

गावकर : असं कसं? म्हटलं तर नियतीचा खेळ म्हणून बघा, म्हटलं तर एखाद्या देशाचं वाटोळं होण्याची प्रक्रिया म्हणून बघा, म्हटलं तर आर्थिक प्रश्नांना जन्म देणारं माणसाचं मानसिक जग म्हणून बघा -- यांतलं काहीच इंटरेस्टिंग नाही?

गायकर : बरं, पण विनोदाचं काय?

गावकर : इराक-इराण युध्द जे सुमारे आठ वर्षं चाललं, त्यात दहा लाख लोक मरण पावले ! याला तुम्ही विनोदाच्या अंगानं कसं पाहणार? -- हा झाला एक प्रश्न ! पण माणसाच्या एकूण जगण्यातला हा एक दाहक विनोदच नाही का -- हा झाला दुसरा प्रश्न !

गायकर : या युध्दातली हानी कशी भरून काढायची आणि या दरम्यान, कुवैतकडून घेतलेलं सुमारे दीड हजार कोटी डॉलर्सचं कर्ज कसं फेडायचं -- या प्रश्नांवर उपाय म्हणून इराकनं कुवैतवर हल्ला केला ! कुवैतवर आणि तिथल्या तेलावर आपला हक्क स्थापित केला म्हणजे हे प्रश्न आपोआप सुटतील हे गणित होतं !

गावकर : तुम्हाला पाहिजे तीच उत्तरं येतील अशा पध्दतीनं तुम्हाला गणितं सोडवू दिली जात नाहीत ! त्याच गणितांची उत्तरं तुमचाच सर्वनाश करणारी अशीही येऊ शकतात ! जगण्यातले सगळे प्रश्न आर्थिक क्षेत्रावर केंद्रित होतात असं म्हटलं जातं -- याचा तपास घेण्याची उत्सुकताही मृत्यू पावलीय? राजकीय

प्रभाव म्हणजे काय याचीही उत्सुकता न बाळगता नुसतं टीव्हीवर क्रिकेटची मॅच बघत बसावं?

गायकर : लोक रोजच्या व्यापतापांनी कंटाळलेले, वैतागलेले, थकलेले असतात. त्यांना डोक्याला ताप नको असतो.

गावकर : मग चाललेल्या सगळया गोष्टींकडं दुर्लक्ष करून, आपलं सगळं सुरक्षित असंच चालेल -- चालत राहील -- असं गृहीत धरून जगत राह्यचं?

गायकर : सगळयाचं भान ठेवून तरी काय उपयोग आहे -- हाच विचार शेवटी प्रभावी ठरतो ! जाऊं दे आता, मरू तेव्हा मरू -- आत्ता तरी त्यातल्या त्यात सुखानं जगू या -- असा हा प्रकार आहे -- सगळी अनिश्चितता मनातनं मान्य आहेच -- म्हणूनच तर ' यही वक्त है करने पूरी आरजू !' असं आहे --( इथे ' आगे भी जाने ना तू ' -- हे गाणे सुरू होते. या गाण्याच्या पार्श्वभूमीवर निरनिराळया शस्त्रास्त्रांची चित्रे, दंगली, युध्दे, अग्निबाण, अणुस्फोट, जखमी पेशंटस् -- अशी चित्रे जात राहतात. काही क्षण असे गेल्यावर ओम आणि प्रिया येतात.)

ओम : तुला थोडक्यात कल्पना दिलेली आहेच -- कधीही, कुणीही माझ्याबद्दल काहीही विचारलं तरी ' माहीत नाही ' एवढंच बोलायचं -- ! ' काम काय करतो? ' -- ' माहीत नाही -- ' असं !

प्रिया : मी जेव्हा ' सत्या ' बघितला होता ना तेव्हा मलाही मनातनं असंच वाटून गेलं होतं की मला असाच पती मिळावा -- धीट -- ॲक्शनपॅक्ड ! पण मीनटाईम मी तुझ्या प्रेमात पडून बसलेले ! तूच माझं ते स्वप्न सत्यात आणशील असं माझ्या स्वप्नातही आलं नसतं !

ओम : याचा अर्थ आपण ' एक दुजे के लिये ' आहोत हेच नक्की ! जगात इतक्या वस्तू, इतकी सुखाची साधनं आहेत-- ती आपल्यासाठी नाहीत असं स्वत:ला पटवत का जगायचं? मोठमोठी हॉटेलं, एसी बंगले, कार्स -- आपल्यासाठी का नाहीत? थोडं कमी जगू पण दिल खोलके जगू !

प्रिया : मलाही हेच पटतं ! तुलाच असं धाडसी जगणं आवडतं त्यामुळं प्रश्नच नाही -- नाही तर माझं जगणं फालतूच झालं असतं ! टीव्ही सीरीयल्स बघणे आणि पोथ्या वाचणे -- असं !

ओम : पण धर्माच्या बाबतीत मला एक पटतं हं -- मराठी पिक्चरमध्ये दरोडा टाकायला जाताना पण देवीला नमस्कार करून जातात -- ते मला फार आवडतं ! मी पण गणपतीची पूजा आणि संकष्टीचा उपास कधी सोडणार नाही ! शिवाय हा गळयातला ताईत !

प्रिया : मलाही गणपतीच आवडतो ! त्याच्या लाईफमध्ये कसं थ्रिल आहे ! धड फक्त धड -- पहिलं -- आपलं ! ओरिजिनल !

ओम : ओरिजिनल आणि थ्रिल हे नेहमी एकत्र असतात, हे लक्षात ठेव ! आपलं आपण काहीतरी केलं पाहिजे ! नुसतं दुसऱ्यांनी पढवलेलं नाही !

प्रिया : मलाही थ्रिलच आवडतं, पण त्यासाठी घरच्या लोकांना दुखवावं लागलं, हे मला जरा दु:खाचं वाटतं !

ओम : प्रिया, कुछ पानेके लिये कुछ खोना भी पडता है !

प्रिया : असा योग्य वेळी योग्य डायलॉग आठवला की खरंच मनाचं एक समाधान होतं ! पण, तरीही, सगळंच छान असं असू शकायला हवं होतं !

ओम : आपल्याला प्रिया, कोणत्याही हालतमध्ये ऐष तर पाहिजेच आहे, गलीके कुत्तेकी जिंदगी नही चाहिये, त्यासाठी मग ताकद लागेल, कधी मनाचा दगड करावा लागेल, भीती सोडून द्यावी लागेल !

प्रिया : माझ्या बाबांनी आयुष्यभर नोकरीच केली पण ते म्हणायचे की नोकरीत पैसा नाही, बिझिनेसमध्येच पैसा आहे !

ओम : खाली बोलके क्या फायदा है ? करके दिखाओ ! आणि योग्य बिझिनेस सापडावा पण लागतो !

प्रिया : तुझी नोकरी आहे की बिझिनेस ?

ओम : ' माहीत नाही ' म्हणायचं ! काय ? ' माहीत नाही ' ! गणपतीपे भरोसा रखनेका ! देवावरच भरोसा नाही तर जिंदगी हराम झाली मग ! आणि गणपती हा सगळ्या देवांत जास्त पॉवरफुल असतो ! त्यालाच पकडायचं !

प्रिया : हं, ते मात्र आहे !

ओम : धंदा असो की नोकरी, गणपतीचं महत्त्व फार आहे ! मला माझे दोस्त सांगत होते -- अमेरिकेतपण आपले लोक जातात तर गणपतीचा फोटो घेऊन जातात ! नोकऱ्या करणारे ! पगार चांगले असतात साल्यांना !

प्रिया : अमेरिकेत? ( इथे हे दृश्य संपते. पुढील दृश्यात प्रेसिडेंट आणि पालव.)

पालव : आपल्याही देशात पर्यावरण वाचवा म्हणणारे, युध्द नको म्हणणारे, इराकवरचे निर्बंध म्हणजे त्यांची सामूहिक कत्तल करणारं हत्यारच आहे असं समजणारे -- असे लोक आहेतच.

प्रेसिडेंट : लोकशाहीत शंभर टक्के पाठिंबा अपेक्षितच नसतो पालव ! आणि असं असणंच चांगलं आहे ! म्हणजे आपल्या जनतेच्या संमतीनं काही हे चाललेलं नाही आहे बाबा, जनता तशी चांगली आहे असं चित्र तयार होतं ! म्हणजे मग आपल्या निरपराध लोकांवर कशाला हल्ला करा असा एक सुविचार आपल्या शत्रूंना सूचू शकतो !

पालव : इतके मूर्ख असतील आपले शत्रू? आपल्याला निवडून तर हीच जनता देत असते ! आणि इतकी गंभीर -- म्हटलं तर गुन्हेगारीची -- कामं आपण करत असतानाही ही जनता किरकोळ काही आंदोलनं करण्यापलीकडे काहीही करत नाही !

प्रेसिडेंट : काय करणार? आपल्या आपल्यात युध्द? आपल्याच सैन्याबरोबर? नि:शस्त्रपणे?

पालव : त्यामुळे संधी साधून तेही कधीतरी आपलेही निरपराध लोक खलास करतीलच !

प्रेसिडेंट : निरपराध म्हणजे काय? तुम्ही म्हणता तेच बरोबर आहे ! आपल्याही जनतेला निरपराध समजायचं

काहीच कारण नाही ! इराकच्या जनतेला निरपराध म्हणता येईल? एवढा महत्त्वाकांक्षी हुकूमशहा जी जनता स्वीकारते ती निरपराध कशी?

पालव : म्हणजे सगळीकडे लोकांनी आपल्याच देशाच्या राजवटीविरुध्द लढा देत मरत राहिलं पाहिजे का काय?जाऊं द्या -- आपण नुसते बाजू बदलत संवाद बोलतोय -- ( गायकर, गावकर येतात.)

गायकर : कुठे कुठे, कसा कसा लढा देणार? आता हे गावकर -- सर्वधर्मसमभाववादी -- आम्हाला धर्मवादी म्हणून खिजवणारे ! हे जातीयवादी नाहीत? अर्थकेंद्र आणि सत्ताकेंद्र आपल्या जातीकडे राहतील हे यांनी वर्षानुवर्षं पाहिलं नाही? आपले सगेसोयरे, नातेवाईक, मित्र यांचे फायदे यांनी बघितले नाहीत? कंत्राटं कुणाला मिळाली? भरभराट कुणाची झाली?

गावकर : ज्या जातीची लोकसंख्या त्या त्या भागात जास्त त्यांना संधी त्या त्या प्रमाणात मिळणारच ना !

गायकर : विषय जातीवर्चस्वाचा आहे -- नुसता प्रमाणाचा नाही ! जात न बघता संधी मिळाल्या का? दोन वेगवेगळया जातींची माणसं असतील तेव्हा निवड कशी केली गेली?

गावकर : पण याला कुणाची हरकत नसते, एवढं तर सगळयांना मान्यच असतं ! निवडणुकांतही जातीधर्मांची गणितं मांडावी लागतातच !

गायकर : मग आम्हाला तत्त्वज्ञान कशाला शिकवता? आमचा हिंदुत्ववाद तर तुमच्या जातीवादापेक्षा खूपच विशाल दृष्टिकोणाचा आहे !

गावकर : दुसऱ्या धर्माविरुध्द संघटन होतं हे ! सगळेच आपले समान दर्जाचे नागरिक असतात !

गायकर : जातीवादात हा दोष नाही का? आणि एका इतिहासाच्या आधारावर ब्राम्हणांना शत्रू मानलेलं चालतं तर तशाच इतिहासाच्या आधारावर आम्ही परधर्मीयांविरुध्द संघटन केलं तर काय होतं? आम्ही फॅसिस्ट आणि तुम्ही पुरोगामी कसे?

गावकर : आम्ही अशा प्रकारचं संकुचित तत्त्वज्ञान कधीही स्वीकारलं नाही !

गायकर : पण वागलो तसे ! तेवढा मात्र आमचा भोळेपणा मान्य ! तो आम्ही आता सुधारू ! मनात वेगळे हेतू ठेवून तत्त्वज्ञान मोठं बोलायचं -- हे आम्हीही यापुढे जमवू !

गावकर : त्या त्या भागातल्या बहुसंख्य लोकांना सुरक्षित वाटणं महत्त्वाचं असतं !

गायकर : आमचं तेच म्हणणं आहे !

गावकर आज काय शंभर वेळा अथर्वशीर्ष म्हणून आलाय का काय? गाडी जोरात चाललीय एकदम !

गायकर : नुसत्या मोठ्या गप्पांचा काही उपयोग नसतो ! हिटलरनं ज्यूंचा छळ केला हे वाईट झालं पण ज्यूंनी तीस लाख पॅलेस्टिनींना देशोधडीला लावणं चांगलं कसं? आणि तेही अमेरिकेच्या पाठिंब्यानं? अमेरिकेच्या राजकारणावर ज्यू लॅाबीचा बराच प्रभाव आहे -- हे निरर्थक आहे?

गावकर : बरं मग?

गायकर : मग काही नाही ! सगळयांकडे वरवर बोलायचा -- माणुसकीचा, तत्त्वज्ञानाचा एक अजेंडा वेगळा असतो आणि मनातला छुपा अजेंडा वेगळाच असतो ! आम्ही या बाबतीत जरा कच्चे पडलो ! ती चूक दुरुस्त करू ! आम्ही मनातलाच अजेंडा बाहेरही बोलत राहिलो !

गावकर : इराक हा खरं तर आपला मित्र -- बांगला देश युध्दाच्या वेळी किंवा काश्मिर प्रश्नाच्या बाबतीत हा देश नेहमी आपलं समर्थन करत होता, पण त्या देशावर सध्या इतका प्रचंड अन्याय चालू असताना तुम्ही एक अवाक्षर बोलत नाही !

गायकर : जाहीर बोलत नाही ! आतून आम्ही त्यांना आपली सहानुभूती सांगितली आहे आणि आपल्या हतबलतेची कारणं पटवून दिली आहेत ! शिवाय युनोच्या पध्दतीनंच चाललंय सगळं !

गावकर : आणि आम्ही धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली अल्पसंख्याकांचा अनुनय करत होतो नाही का? मग तुम्ही करता ते काय म्हणायचं? आम्ही काही म्हणायची गरजच नाही ! तुमचेच पाठीराखे तुम्हाला जाहीर लाथा घालतायत !

गायकर : चुका दुरुस्त करायला काय बंदी आहे काय? आमच्या मनात काय आहे हे आता पुरेसं एस्टॅब्लिश झालं आहे, आता आम्हालाही मोठंमोठं बोलायला -- वागायला काहीच हरकत नाही ! मनात काय आहे हे माहीत असल्यानं आमचे पाठीराखे टिकून राहतीलच आणि बोलणं मोठं ठेवल्यानं इतरही काही आमच्या बाजूला येतील !

पालव : हे यांचं ऐकल्यावर प्रेसिडेंट, मला आपल्या सुदामच्या एका ऑब्जेक्शनची आठवण येते. इराक आणि तुर्कस्तान यांचे भूभाग बळकावून कुर्द लोकांना त्यांचा स्वत:चा देश स्थापन करायचा होता ही तर फॅक्टच होती. सुदाम काय म्हणाला होता की आम्ही कुर्द लोकांवर हल्ले करतो म्हणून इराकच्या उत्तरेतला विभाग तुम्ही ' नो फ्लाय झोन ' -- विमानांना बंदी असलेला -- ठेवला होता, पण त्याच भागात तुर्कस्तानची विमानं येऊन कुर्द लोकांवर बाँबफेक करत होती तेव्हा तुम्ही डोळे मिटून बसलात ! तेव्हा कुर्द लोकांचं रक्षण कुठे गेलं? त्याचं म्हणणं, त्यांना त्रास न पडता परस्पर कुर्द लोक मारले जात होते हे बरंच होतं पण हे त्यांना त्यांची दहशत बसावी अशा पध्दतीनं करायचं होतं एवढंच ! त्यानं तत्त्वाच्या अंगानं विचार केल्यामुळं तो असा गोंधळला ।

प्रेसिडेंट : म्हणूनच तत्त्वाबित्त्वाचा विचार फार करू नये ! आपला एक सेनाधिकारी मला भेटला होता -- त्याचे काही सैनिक सुदामच्या लोकांनी मारले होते ! याचा त्याला सूड घ्यायचा होता ! म्हटलं वेडा आहेस ! त्यांना मार पण सूड हे तत्त्व ठेवू नकोस ! इतक्या उंचीवर आपले विचार पोचल्यानंतर पुन्हा खाली कुठल्याही तत्त्वाकडे येणं योग्य होणार नाही !

गावकर : हे सगळे प्रश्न महत्त्वाचे असतातच पण तरीही न्यायासाठी चांगलं वागावंच लागेल !

गायकर : हे असले प्रश्न महत्त्वाचे म्हणू नकोस वेड्या ! आर्थिक प्रश्नच खरे महत्त्वाचे असतात असंच म्हणत

राहा ! नाहीतर लोक तुला प्रतिगामी म्हणतील ! आमचेही प्रयत्न यापुढे पुरोगामी म्हणवून घेण्याचेच राहणार आहेत. आम्हीही आर्थिक विकास हेच आता आमच्या प्रचाराचं केंद्र ठेवणार आहे !

प्रेसिडेंट : पालव, आपल्याला ज्या वेळी जसं वाटेल तसं वागणं याशिवाय आपण काय करू शकतो? सगळयांच्याच वागण्यात, अंतर्विरोध असतात हे आता सगळयांनाच समजतं ! हे आता फार कोणी मनावर घेत नाही ।

गावकर : तुम्ही तुमच्या पाठीराख्यांची फार मोठ्या प्रमाणावर फसवणूक केलीय -- आमचं तसं तरी नाही ! -- आधी राममंदीर म्हणायचं आणि मग टोटली ते सोडून द्यायचं -- असलं तरी आम्ही करत नाही !

गायकर : मुळात ' टोटली ' हा शब्द चुकीचा आहे. नीट संधी मिळेपर्यंत -- असं खरं तर ते आहे. आतून आमच्या लोकांना आम्ही हे समजावून देतच असतो ! ( इकडे जयवंत आणि पंतप्रधान येतात. )

जयवंत : ( फोन करतात, पालव घेतात, मग -- ) आता ते आदिमानव आणि मर्कटमुख नको -- जरा दुसरं बोलतो --

पालव : हं, बोला -- ( इथं गायकर, गावकर जातात.)

जयवंत : तुम्ही आणि तुमचे प्रेसिडेंट यांचे सुमारे दहाबारा वर्षांपूर्वीचे फोटो घ्या आणि त्या फोटोंजवळ तुमचे आताचे फोटो ठेवा -- फरक दिसेल ! तुमचे चेहरे काटेरी झालेत !

पालव : ( प्रेसिडेंटना -- ) जयवंत बोलतोय -- गेल्या काही वर्षांत आपले चेहरे काटेरी झालेत म्हणतोय --

प्रेसिडेंट : ( पालवना -- ) त्याला म्हणावं ' काँटा लगा ' याचा अर्थ समजून घ्यायचाय का म्हणावं !

पालव : ( फोनवर -- ) ' काँटा लगा ' चा अर्थ हवाय का म्हणतायत प्रेसिडेंट !

जयवंत : आयला वेडे का काय तुम्ही -- त्यांना कशाला सांगितलं ! तुमच्यापुरतं ठेवा -- आमच्याकडे हिंदी सिनेमात व्हिलन वेगळा ओळखू यावा असा त्याचा मेकप करतात -- तुम्ही दोघं विदाऊट मेकप तसे दिसताय हल्ली ! पापं वाढत चालली तुमची ! बाहेरची सोडा ! तुमच्याच डोक्यांतली ! हिंदू तत्त्वज्ञान याला कर्म म्हणतं !

प्रेसिडेंट : पालव, फोन ठेवा खाली -- मला येतंय सगळं ऐकू -- त्याला म्हणावं, पंचावन्न-साठीच्या पुढची सगळीच माणसं व्हिलन दिसत असतात -- आम्ही आता सगळयांचे बॉस आहोत तर ते आमच्या चेहऱ्यांवरून ओळखू आलेलं चागलंच आहे !

जयवंत : अहो प्रेसिडेंट, हेही ऐकलं काय तुम्ही? बापरे ! हे सगळं का बोलतोय तर आम्हाला तुमचे क्लास लावायचेत ! एकलव्याप्रमाणे ऑलरेडी आम्ही तुम्हाला गुरू मानलेलंच आहे !

पंत : नमस्कार हो प्रेसिडेंट !

प्रेसिडेंट : नमस्कार ! तुमचे मोठे मित्र -- रशियन्स -- कोलमडून गेलेत ! पॉलिसी बदला आता !

पंत : अहो प्रेसिडेंट, रूळ बदलताना गाडी एका रुळावरून दुसऱ्या रुळावर टुणकन उडी मारून जाते का?

गाडी रूळ बदलतेय हे दिसतंय ना तुम्हाला?

प्रेसिडेंट : ठीक आहे, ठीक आहे ! या तुम्ही दोघंही एकदा गप्पा मारायला ! मजा करू !

पंत : तुमचं आमंत्रण आम्ही स्वीकारतोय ! उद्या ही बातमीच देतो ! आमच्याही मनात आहेच !

प्रेसिडेंट : असू द्या तुमच्या मनात -- आमच्यासारखं व्हायचं -- पण सध्या तरी कुणीच नाही ! आमचा देश पॉवरफुल, आमची अर्थव्यवस्था पॉवरफुल ! अहो आज सगळया जगाच्या मानवी हक्कांची काळजी घ्यायची जबाबदारी आम्ही पेलू शकतो की नाही !

पंत : आम्हाला तर वाटतं की याची गरजच पडू नये ! शांतता असावी !

प्रेसिडेंट : चुकताय तुम्ही ! अशी टोकाची शांततावादी भूमिका काय कामाची ? अशी भूमिका म्हणजे तर भूमिकेसकट आपली ओळखच विसरून जावं लागेल ! जगाकडं डोळे उघडून पाहा ! तुम्ही म्हणता असं जगता येईल? नाही ना? मग? यासाठीच प्रत्येकानं शांततावादी राहून युध्दही करायला हवंच ! वेगवेगळया प्रकारच्या वेडेपणाचा अंश प्रत्येकात असायलाच हवा -- त्याशिवाय काय किंमत राहील त्याची या जगात? विज्डम कॅन नेव्हर बी ॲब्सोल्यूट ! एकमेकांतले संबंध संघर्षमय नसतील तर ते आहेत हेही कळणार नाही ! नाही त्या तत्त्वज्ञानाच्या मागं लागून काय उपयोग आहे? भौतिक सत्य नाकारू नका !

पंत : हेही चिंतन चालू असतं म्हणजे तुमचं ।

प्रेसिडेंट : अहो, चला, मी मान्य करतो की तुमचाही देश मोठा आहे, पॉवरफुल आहे -- आपण दोघंही मानवजातीच्या हितासाठी समजा एकमेकांच्या विरुध्द दिशांनी कटिबध्द आहोत -- यातून काय सिध्द होतं? एकमेकांच्या विरुध्द दिशांनी जाणाऱ्या विचारांतही मानवजातीचं हित असू शकतं ! अशी गंमत आहे ही !

पंत : आम्हाला काय वाटतं की समजा, चीन, रशिया, तुम्ही हे मोठे आहात की नाही? मुख्य म्हणजे अण्वस्त्रधारी आहात ! आम्हीही आहोत म्हणा ! तर हे सगळे एकमेकांना भिऊन एकमेकांशी चांगले वागतात की नाही? तर ते चांगलं वागणं तसंच चालू ठेवायचं आणि त्यातलं एकमेकांच्या भीतीचं दडपण घालवण्यासाठी अण्वस्त्रं सगळी नष्ट करायची ! -- असं नाही होऊ शकणार?

प्रेसिडेंट : मग तर काय, किरकोळ, किरकोळ देशही चांगलं वागतील !

पंत : मग तर छानच ना?

प्रेसिडेंट : मग आमचं चांगलं वागणं आणि त्यांचं चांगलं वागणं यांत फरक काय राहणार मग? निरर्थक होईल सगळं !

पंत : आम्हाला प्रेसिडेंट, हिंदुत्ववाद असा पटकन सोडता येणार नाही ! लक्षात घ्या ! हिंदुत्ववाद वर्चस्ववाद नाकारतो !

प्रेसिडेंट : तुम्ही एवढ्या मोठ्या चिंता नका करू एवढ्यात ! सबंध जगाच्या व्यापारात तुमचा हिस्सा किती? फक्त अर्धा टक्का !

पंत : तेच म्हणतोय ! तो हिस्सा बऱ्यापैकी वाढेपर्यंत तरी आम्हाला हिंदुत्ववादाशिवाय पर्याय नाही !

प्रेसिडेंट : तत्त्वज्ञान बोलतो आपण सगळेच, पण सदासर्वकाळ आणि सगळीकडे आपल्या आचरणात राहील असं तत्त्वज्ञान कुणाकडेच नाहीय । टिकाऊ काहीच नाहीय । बोला काहीही, आपलं चाललंय एकच -- म्हणजे दुटप्पी जगणं -- एवढं लक्षात ठेवा ! आता संजय गांधी हा एके काळी तुमच्या पक्षाचा नंबर एकचा शत्रू होता -- त्याची बायको मेनका आणि मुलगा वरुण आज तुमच्या पक्षात आहेत ! राजीव गांधींच्या हत्येत तो गॉगलवाला करुणानिधी इनडायरेक्टली इन्व्हॉल्व्हड आहे असं लोक म्हणत होते -- आज, राजीवच्या पत्नी सोनिया गांधी त्याच्याशी एकोपा साधतायत !

पंत : राजकारण, प्रेम आणि युध्द ! यांत सगळं माफ असतं !

प्रेसिडेंट : करप्ट सगळं ! करप्ट ! असावंच लागेल ! हेरगिरी, दुसऱ्यांचे उमेदवार फोडणे, पक्षफंड उभा करणे, कार्यकर्ते सांभाळणे, पुढल्या निवडणुकांसाठी बेगमी करणे, आपल्या दहा पिढ्यांची बेगमी करणे - यांचे कुठं कायदेशीर रकाने असू शकतात का? पण तुमच्या देशातले लोकही मान्य करायला लागलेत हे सगळं ! हिंदुत्ववादामुळं सत्य कळायला फार वेळ लागतो ! नाईलाज ! ते सगळं द्या सोडून ! हजारो वर्षांत माणूस कुठल्याही धर्माप्रमाणे जगू शकलेला नाही। आमचंच करेक्ट आहे ! आणि आमचं सगळं विज्डम एका दिवसात काढून नका घेऊ ! बरंय आता । भेटू !

पंत : बरंय, बरंय, नमस्कार ! ( प्रेसिडेंट आणि पालव जातात -- गावकर, गायकर येतात.)

गावकर : या भोसडीच्यांच्या देशात जगातल्या संपत्तीच्या निम्मी संपत्ती आहे म्हणतात ! ही संपत्ती मोजतात कशी ते काही मला माहीत नाही ! आणि जगाच्या लोकसंख्येच्या फक्त सात टक्के लोकसंख्या तिथे आहे. त्यातले दोन टक्के गरीबच आहेत -- म्हणजे सुमारे ५-६ टक्के लोकांच्या हातात जगातली निम्मी संपत्ती आहे !

गायकर : हे वाढतच जाण्याची शक्यता आहे ! शस्त्रास्त्रं, मोटारगाड्या, इलेक्ट्रॉनिक वस्तू, कॉम्प्यूटर्स, विमानं, जहाजं अशा उच्च तंत्रज्ञानाच्या वस्तूंचं उत्पादन हे करतात ! शिवाय शेतीमाल आहेच ! चहूंबाजूंनी चांदीच चांदी !

गावकर : यांच्याच देशात काही लोक असे आहेत की ते म्हणतायत, युध्दखोरी नको, अण्वस्त्रं नष्ट करू या आणि शस्त्रास्त्रांचा व्यापार थांबवू या ! तर हे नेते भडवे काय म्हणतात, असं वाटणाऱ्यांना देशद्रोही का म्हणू नये? त्यांच्या सूचना म्हणजे देशाला नुसतं गरीबच नव्हे तर मऊ मांजर बनवतील !

पंत : जयवंत, त्या गावकरला काही कळतं का हो? नुसती चांगली तत्त्वं, चांगले विचार आपण बाळगतो म्हणजे आपण फार श्रेष्ठ आहोत असं समजतोय तो !

जयवंत : त्यांना बोलू देणं आणि आपण योग्य ते कर्म करत राहणं एवढंच आपण करू शकतो ! अशा चांगल्या विचारांच्या चळवळी करून इथं स्वर्ग अवतरू शकेल असं त्यांना वाटतं !

पंत : मुळात खरंच आपल्यापेक्षा ते लोक इतके वेगळे असतात का? की त्यांना आत्मप्रौढी आवडते इतकंच आहे?

जयवंत : आत्मप्रौढीच ! काही समाजसुधारणा होत राहतात तर त्यांना वाटतं आता आख्खा माणूसच शहाणा होईल ! एक समाजसुधारणा घडेपर्यंत दुसऱ्या हजार अन्याय्य गोष्टी अस्तित्वात आलेल्या असतात हे त्यांना कळत नाही ! आणि या विषयावर जास्त बोलून उपयोग नाही, कारण मग ते पुन्हा धर्माकडे जाईल ! त्यांनाही ते नको आहे आणि आपल्यालाही ! ते बुध्दीप्रामाण्यवादी आणि आपण सत्ताप्रामाण्यावादी ! दोघंही भौतिकच !

पंत : पर्फेक्ट ! पण धर्माचं बोलत राह्यचंच बरं का ! चला ! ( ते दोघे जातात -- गावकर, गायकर येतात.)

गावकर : तर दरम्यानच्या काळात इकडे काय झालं हेही पाहायला हवं --

गायकर : एखादा माणूस बेपत्ता होऊन किंवा पळून जाऊन सात वर्षं होऊन गेली आणि त्या अवधीत त्याचा काहीच पत्ता लागला नाही तर कायद्याप्रमाणे तो मृत धरला जातो. ओमच तसंच झालं ! तो मृत धरला गेला ! पण घरच्यांची आशा बलवत्तर म्हणून फोटोला हार घातला नाही इतकंच !

गावकर : दरम्यानच्या काळात वेदांगचं लग्न झालं ! एका विधवेशी ! तिचा नवरा ॅक्सिडेंटमध्ये गेला होता ! काय करणार, लग्न तर करायचं होतं ! पण विशेष म्हणजे मुलगी खरंच गुणी निघाली ! जबाबदाऱ्या पार पाडणारी, सगळयांशी मिळूनमिसळून राहणारी !

गायकर : पुढे त्यांना मुलगाही झाला ! त्यामुळं, होतं ते चांगल्यासाठीच होतं असं म्हणायची पध्दत त्या घरात तरी पुन्हा चालू झाली ! ( इथे अव्दैतांच्या घरातले दृश्य. वेदांग विचारात बसलेला. प्रकाश येतात. )

प्रकाश : ( दोन क्षणांनी -- ) आता कसला विचार करतोस? अनेक अडथळयांमधनंही चांगलंच झालंय ना शेवटी -- होतं ते चांगल्यासाठी होतं असं म्हणायचं ! .

वेदांग : चांगला संसार जर माझ्या नशीबातच होता तर तो मिळालाच असता ना -- पण त्या गाढवामुळं -- ओममुळं -- मला विधवेशी लग्न करावं लागलं !

प्रकाश : काय फरक पडला?

वेदांग : ओरिजिनल नाही ना बायको -- लोकांच्या मनात येतच असणार ते --

प्रकाश : अरे, मागचं काही आठवून ती स्वत:ला आणि दुसऱ्यांना दु:खी करत बसत नाही ना -- मग ओरिजिनलच ती ! आणि लोक कोण? जे स्वत: दु:खानं बरबरटलेले असतात तेच असे दुसऱ्यांच्या गोष्टी चघळत असतात ! ते स्वत: मुळात भंगार असतात !

वेदांग : कधीकधी येतो हा विचार एवढंच !

प्रकाश : मग तू ओरिजिनल असण्याचा उपयोग काय? मागच्या गोष्टींचा आजच्या जगण्यावर तू परिणाम करत राहिलास तर तिला जाणवणारच ते ! मग तू कसला ओरिजिनल?

वेदांग : जगण्यात असल्या तत्त्वज्ञानाचा काहीही उपयोग नसतो !

प्रकाश : नाही कसं ? मी तुझ्या आईशी कधीकधी खूप वाईट वागलो होतो -- ते विसरून ती आज चांगलं वागतेय ना -- मग चांगलंच की ते ! -- तिच्याबाबतही संताप वाटावा असे काही प्रसंग येऊन गेलेच ! -- मी कुठे ते सतत लक्षात ठेवून वागतो?! -- आपण जगतोय ते शक्य तो नीट जगायचं । याला मग दडपणं म्हणा नाही तर तडजोड म्हणा !

वेदांग : एवढं जर तुम्हाला कळतंय आणि ते जर महत्त्वाचं आहे तर पैशाच्या बाबतीत तुम्ही मागं का पडला? मिळणाऱ्या पैशाबाबतचेही तुमचे निर्णय का चुकले?

प्रकाश : म्हणजे सगळे राग-संताप जर मी सतत जिवंत ठेवले असते तर अधिक यशस्वी झालो असतो !

वेदांग : माझं म्हणणं, काहीही कळण्याचा आणि यशस्वी होण्याचा संबंधच नाही -- त्यामुळं, तुम्हाला जे कळतं असं तुम्हाला वाटतं ते आम्हाला मुळीच कळलं नाही तरी काहीही फरक पडणार नाही ।

प्रकाश : आता असलं नको बोलूस । हे दोन वेगवेगळे मुद्दे आहेत । मागचं विसरणं आणि आर्थिक यश । समज मी आर्थिक अपयशी आहे पण त्यामुळं मला एकूणच मूर्खात नको काढूस । आणि नशीब मान्य करतोस तर आर्थिक अपयशाचं खापर माझ्यावर कशाला फोडतोस? ते माझं नशीबच नाही का? !

वेदांग : शेवटी बोलताना, जो तो माणूस आपले आपले निर्णय घेत गेला असं धरूनच बोलावं लागतं ।

प्रकाश : त्यासाठीच थोडंफार शहाणपणही उपयोगी पडतं । आपले आपले निर्णय घ्यायलाही आणि दुसऱ्यांबद्दल बोलायलाही । आणि तुम्ही पळा की पैशाच्या मागं । बघा काय होतंय ते ।

वेदांग : शाप नका देऊ ।

प्रकाश : शाप म्हणून बोलतच नाहीय मी ।

वेदांग : ठीक आहे, जाऊं द्या, मधनंमधनं तो विचार येतो माझ्या डोक्यात आणि होतो मी दु:खी । जाऊं द्या । आम्हाला दु:खी व्हायचं असेल तेव्हा आम्ही दु:खीही होऊ । जाऊं द्या ।

प्रकाश : दु:खी होण्याचे प्रकार कमी करता येतील का हा एक नम्र विचार मी मांडला एवढंच । आणि सगळया संतांनीही या प्रश्नाचा मागोवा घेतलेला आहे ।

वेदांग : संत । मला तर ' संत ' ही गोष्ट काल्पनिकच वाटते । आणि समजा खरी असली तरी ती गोष्ट तशी निरुपयोगीच आहे --

प्रकाश : ( चिडून -- ) जाऊं दे मग -- ( जातात. इथे हे दृश्य संपते. पुन्हा मूळ दृश्य सुरू. )

गावकर : ओम हरवला त्याला कसं कोणं चांगलं म्हणेल? -- पण त्यामुळं वेदांगला विधवा बायको स्वीकारावी लागली आणि त्यातून त्याचा संसार मार्गी लागला । -- हे तर चांगलंच झालं ना ! आणि त्या विधवा

मुलीचंही चांगलंच झालं की ! तिच्याकडच्या लोकांचीही काळजी मिटली ! नातू झाल्यानं आनंदही झाला ! आणि तसं पाहिलं तर अव्दैत पतिपत्नींचंही तसं चांगलंच झालं की ! ओमचं सगळयांच्या अंगवळणीच पडून गेलं ! मृत्यूसारखंच !

गायकर : पुढे कधीतरी काय झालं तेही इथंच सांगून टाकू म्हणजे कथानकाची ती लाईन संपून जाईल ! ओम टोळीयुध्दात मारला गेला ! प्रिया परत आली नाही पण तिचं तिच्या आईवडिलांना ही हकीगत कळवणारं पत्र आलं -- त्यामुळं ते कळलं ! तेवढ्या पत्राच्या आधारावर अव्दैतांचं व्याहीपण स्वीकारून प्रियाचे आईवडील अव्दैतांकडे येऊन गेले ! एकूण माहिती द्यायला आणि अर्थातच सांत्वन करायला ! व्याह्याव्याह्यांची पहिली भेटच अशी सांत्वनासाठी झालेलं जगातलं हे एकमेव उदाहरण असेल ! असो ! आता पुन्हा तो -- अलीकडचा -- मघाचा काळ ! --

गावकर : काळ आमच्या अधीन आहे हे शक्यतो पटावं ! --

गायकर : आणि इकडंही सात वर्षं गेली. मध्यंतरीच्या काळात प्रेसिडेंट-मस्की प्रकरण जगभर गाजलं ! त्या खतरनाक मुलीनं प्रेसिडेंटची सालटी काढली ! तिचे आणि प्रेसिडेंटचे संबंध हे तिनं जाहीर आरोपांचे आणि चौकशीचे विषय केले ! तिला आता तिची किंमत वसूल करायची होती ! पण प्रेसिडेंटनीही धाडसीपणाचा आणि धीरोदात्तपणाचा एक आदर्श पेश केला ! तासंतास चालणारी प्रश्नोत्तरं धीरानं पार पाडली ! न्यायाची बूज राखणंही आवश्यकच होतं ! प्रेसिडेंटच्या पत्नीनंही त्यांना या अवघड काळात साथ दिली ! मस्कीच्या जीवनावर आता पुस्तक प्रकाशित होणार असून त्याची कोट्यवधी डॉलर्सची उलाढाल अपेक्षित आहे ! असो. आणि हो, इकडची सात वर्षं ! एक्क्याण्णव साली इराकवर बॉम्बिंग झालं -- एका नांदत्या, प्रगतिपथावरच्या देशाची वाट लागली ! म्हणजे बरीचशी वाट लागली ! आधीपासूनच चालू असलेले निर्बंध पुढेही चालूच होते ! अठ्ठयाण्णव साल आलं !

गावकर : आता पुन्हा इराकला मूळपदाला कधीच येऊ द्यायचं नव्हतं ! नाहीतर काय हो, युध्दावर केलेला इतका प्रचंड खर्च वायाच म्हणावा लागला असता ! ' हाल ' या शब्दाचा अर्थ किती वाईट असू शकेल तेवढं झालं ! आता आणखी एक प्रस्ताव निघाला ! इराकवर सतत नजर हवी ! नाईलाजानं सुदाम पुन्हा प्रेसिडेंटना भेटायला आले -- ( दोघेही जातात. पालव आणि प्रेसिडेंट येतात. बसतात. काही क्षण शांतता.)

पालव : आलाय, हॉटेलात आहे -- दारू, जेवण काही नकोच म्हणत होता मग जेवण घ्यायला तयार झाला --

प्रेसिडेंट : पोषाख कुठला आहे?

पालव : लष्करी नाही -- साधा झब्बालेंगा -- चेहरा सगळा खलास झालाय --

प्रेसिडेंट : हं --

पालव : बरोबर त्याचा एकच सहकारी आहे -- पण इकडे एकटाच येतो म्हणलाय --

प्रेसिडेंट : हं --

पालव : आता मस्की नाहीय ते एक बरंय ! -- या वेळी तुम्ही तिला बोलावलं असतं तर फार क्रूर वाटलं असतं त्याला ! चेष्टा वाटली असती !

प्रेसिडेंट : हं -- ( दोन क्षण शांततेनंतर -- ) त्या पोरीनं एक चांगलाच धडा दिला -- तिच्यायला !

पालव : मला ती मुलगी खतरनाक वाटत होतीच -- मी तुम्हाला सांगितलंही होतं -- पण तुम्हाला मधनं मधनं आनंदाचे क्षणही हवेतच हेही पटत होतं ! --

प्रेसिडेंट : ते तर आहेच -- प्रत्येक गोष्टीची किंमत मोजावी लागते हेच खरं --

पालव : ( क्षणभरानं -- ) कधीकधी असं मनात येतं प्रेसिडेंट, की जगात सगळयांत पॉवरफुल असणं म्हणजे जर हे असेल आयुष्य -- असलं -- तर काय अर्थ आहे या सगळयात?

प्रेसिडेंट : मग दुसरा कुणीतरी होईल पॉवरफुल -- आपल्याला चेपेल -- त्याच्यात तरी काय अर्थ असेल?

पालव : ( हळू आवाजात -- ) आलाय तो ! ( क्षणभरानं सुदाम येतात. पालव अदबीने त्याना बसवतात.)

सुदाम : एवढं बास नाही झालं? हे काय नवीन?

प्रेसिडेंट : अरे हो, या, बसा, पाणी घ्या -- दारू मागवू?

सुदाम : ते झालंय सगळं ! --मुद्याचं बोलू या --

पालव : रागानं नको -- शांतपणेच बोलू या -- शांतपणे --

प्रेसिडेंट : हे बघा सुदाम, कुठलीच तत्त्वं मनात आणायची नाहीत असं म्हणजे आमच्यासारखं मॅच्युरिटीनं जगायला फार मोठी पॉवर लागते ! -- ते तर तुम्हाला शक्य नाही ! मग ' सूड ' हे तत्त्व तुमच्या डोक्यात येणारच नाही -- असं कसं शक्य आहे? साहजिकच आहे ना ते ! डोक्यात येणं !

सुदाम : साधं जिवंत राहायची ताकदही संपत आलीय आमची -- आम्ही कसला सूड घेणार?

प्रेसिडेंट : जिवंत आहात ना पण -- बरेचसे? राग, लोभ, सूडभावना हे काहीच नसेल तर तो माणूस मेला आहे किंवा वेडा झाला आहे असं समजावं !

सुदाम : पाच वर्षांच्या आतली मुलं -- पाच लाखांहून जास्त -- तुझ्या नीचपणामुळे मेलीयत आमची फोदरीच्या !

( क्षणभर शांतता.)

प्रेसिडेंट : शिव्या दे तू -- जिवंतपणाचं लक्षण आहे ते !

सुदाम : आपल्या मुलाची किंवा मुलीची प्राणज्योत मालवताना काहीही करू न शकणारे आणि बघत बसण्याशिवाय पर्यायच नसलेले आईबाप हे तर आमच्याकडे घरोघरी दिसणारं चित्र झालंय ! तुमच्या बॉम्बवर्षावात तर किती माणसं मेली याची गणतीच नाही रे मादरचोद !

प्रेसिडेंट : मग आता आईघाल्या, मला सांग, तू कुर्द लोक मारलेस ते का रे झवाड्या? त्या लोकांना काय आनंद

देण्याचं काम चाललं होतं तुझं?

सुदाम : रस्ते, पूल उद्ध्वस्त झालेयत, वीजकेंद्रं नष्ट झालीयत, सांडपाण्याची प्रक्रिया करणारी यंत्रणा बरबाद झालीय, संपर्कयंत्रणा कोलमडलीय, इस्पितळं, शाळा मातीत गेल्यायत, प्यायला चांगलं - शुध्द पाणी नाहीय, औषधं नाहीयत, अन्न मिळत नाहीय आणि आजारी माणसं नुसतीच तडफडत पडलीयत -- हे तुझे मानवी हक्क का रे च्युतमारीच्या?। वर तोंड करून जगाला तत्त्वज्ञान शिकवत फिरतोस की रे अक्करमाशा !

प्रेसिडेंट : पालव, रेस्टलेस होऊ नका -- शिव्यांचा वापर होणार ! -- एकमेकांना त्रास देऊ शकणारी दोन सज्जन माणसं समोरासमोर आल्यावर असं थोडंसं होणारच ! डोंट वरी ! किती झालं तरी सुदाम आपला मित्र होता -- म्हणजे आहेच म्हणेन मी -- अजूनही ! आणि सुदाम, आमच्याकडे तर लोकशाही आहे -- याच्या उलट तुझ्याकडे आहे हुकूमशाही ! तुझ्या विरोधात जाणाऱ्या लोकांना तू काय करतोस रे शिंदळीच्या? ।

सुदाम : लहान लहान मुलं मारतोयस तू भोसडीच्या, हलकटा !

प्रेसिडेंट : सुदाम तुझा बॅलन्स जातोय ! गरज पडल्यास आपण दोघेही कितीही क्रूर, अमानुष होऊ शकतो ! दॅट इज लाईफ !

सुदाम : तुझी ती ऑईल फॉर फूड योजना ! आलेल्या पैशातनं आधी, ठरल्याप्रमाणे, कुवैतला नुकसान भरपाई द्यायची, युनोच्या आमच्यासाठी होणाऱ्या खर्चातला भाग द्यायचा आणि मग उरलेल्या रकमेत काय घ्यायचं हे तुमची कमिटी ठरवणार -- बरीच कागदपत्रं तयार करत -- वेळ काढत -- आमच्या लोकांना अन्नासारख्या अत्यावश्यक गोष्टी मिळाव्यात यासाठी आहे ना रे ही योजना राक्षसा? तुझ्याइतक्या विषारी मेंदूचा दुष्ट माणूस मानवजातीत कधीच निर्माण झाला नसेल !

प्रेसिडेंट : अरे, तू तोडू शकशील माझा विक्रम, फक्त पॉवर पाहिजे रे वेडपटा, त्यात तू कमी पडतोयस ! हरकत नाही, प्रयत्न करत राहा !

पालव : प्रेसिडेंट, अशी शिव्यागाळी आणि वादावादी करून काय निघणार आहे त्यातून? नीट कामाचं बोलू या ना त्यापेक्षा ! काय सुदाम !

प्रेसिडेंट : याच्याजवळ काही शस्त्रबिस्त्र नाही ही तपासणी इथं प्रवेश करण्याआधी झालीय ना? शिवाय एक सेकंदात, याला बदडून काढायची योजना मी अंमलात आणू शकतो ! तर असू दे ! बोल, सुदाम बोल, बोल तू । ( पालव तटस्थ बसून -- )

सुदाम : तू नीच माणूस आहेस !

प्रेसिडेंट : आता इराणबरोबरच्या युध्दात आम्हीच तुला सपोर्ट दिला -- रासायनिक हत्यारं तयार करण्यासाठी सगळं मटेरियल पुरवलं -- हे मान्य, पण अशा रासायनिक हत्यारांचा उपयोग करताना तुझं हृदय काय

प्रेमळपणानं भरलेलं होतं का रे रांडेच्या?

सुदाम : आगळीक त्यांची होती !

प्रेसिडेंट : आगळीक त्यांची होती असं दिसण्यासाठी काय करायचं हे कारस्थान तू आणि मी दोघांनी मिळूनच रचलं होतं, त्यामुळं, आगळीक त्यांची होती हे मलाही मान्यच आहे, पण आगळीक त्यांची होती हे तू मला सांगतोयस काय रे च्युत्तड?

सुदाम : आपला देश सुरक्षित राहावा असं वाटण्यात काय चूक आहे?

प्रेसिडेंट : अरे, भीती ही प्रत्येकाला असते बाबा ! तुला काय वाटतं आम्हाला भीती नाही? थोडाही आक्रमकपणा ज्याच्या अंगात आहे त्याला भीतीचा प्रॉब्लेम असणारच ! भीतीच नाही तर कसलं जगणं ते !

सुदाम : कुवैतनं आमच्या रुमेलातल्या तेलविहिरींतलं तेल चोरलं होतं हे तुलाही मान्य आहे आणि इराणनं आमचे परराष्ट्रमंत्री अझिज यांचा खून करायचा प्रत्न केला हेही तुला मान्य आहे !

प्रेसिडेंट : अरे तू मित्र असताना आणि तुझ्याकडून काही गोष्टी साध्य करून घ्यायच्या म्हणून त्या त्या वेळी मान्य केलेलं आजही मला मान्यच आहे, तो प्रश्न नाही ! पण त्या आधारावर तू आर्ग्युमेंट नको करूस -- निदान माझ्याशी तरी ! तुझ्या गांडीवरची रेघ न रेघ मला माहिती आहे !

सुदाम : आणि तुझं आणखी एक ' दुहेरी उपयोगा ' चं तत्त्व ! दुहेरी उपयोग होऊ शकेल अशा वस्तू आमच्याकडे जाऊ द्यायच्या नाहीत ! याखाली तू मुलांना शाळेत लागणाऱ्या शिस्पेन्सिली पाठवणं बंद केलंस भांचोद ! का तर त्या पेन्सिलीतलं शिसं काढून त्याचा आम्ही आमच्या विमानांवर थर देऊ आणि त्यामुळं ती विमानं तुमच्या रडारवर दिसणार नाहीत ! विमानं शिल्लक तरी आहेत का रे माकड्या आमच्याकडे?।

प्रेसिडेंट : आमच्या हेरखात्याचा रिपोर्ट आहे बाबा तसा ! कुठंतरी गुप्त जागी तुम्ही विमानं लपवलेली आहेत !

सुदाम : तुझं हेर खातं ! अरे बाराच्या, तुझ्या हेरखात्याकडून तुला हवा तसा रिपोर्ट मिळू शकणार नाही का? !

प्रेसिडेंट : आपण एकमेकांवर अजिबातच विश्वास ठेवायचा नाही असं करून कसं चालेल मित्रा !

सुदाम : ' मित्रा ' ही पण शिवीच वाटतेय मला !

प्रेसिडेंट : च्यायला, दोन कोटींचा पण नाही तुझा देश, पण टिवटिव फार ! परमेश्वरानं दिलेली तेलाची देणगी तू स्वत:चीच समजून चालायला लागलास ! आहेस एक साधा बेडूक पण फुगून बैलासारखं व्हायला लागलास ! असल्या प्रयत्नांचं भवितव्य ' फुटणे ' हेच असतं !

सुदाम : देवाच्या कृपेनं तू इथल्या खुर्चीवर आहेस -- ही तू स्वत:चीच समजतोयस ना पॉवर !

पालव : मी बोलू का जरा मधे?

सुदाम : जागतिक निर्लज्ज साले ! आमची पाच लाखांहून जास्त मुलं मेली तुमच्यामुळे, तर त्याबद्दल काय वाटतं असं तुमच्या त्या मॉडेल बाईला एका पत्रकारानं विचारलं, तर एखाद्या चांगल्या गोष्टीसाठी अशी किंमत

द्यावीच लागते असं म्हणाली ती रांड ! म्हणजे आमच्या लोकांना माझ्यापासून मुक्ती मिळण्यासाठी !

प्रेसिडेंट : आता बास हं ! तुला खूप त्रास झालेला आहे म्हणून मी जरा ढील दिली इतकंच ! पण आता जरा जीभ आवर तुझी !

पालव : सुदाम, ती फार साधी, सज्जन बाई आहे, तिलाही शिव्या देतोस?

सुदाम : बाई कुणाला म्हणायचं - मातेचं हृदय असेल तिला !

पालव : तसं नाही सुदाम, आपल्यालाही नसतं पित्याचं हृदय ! अं !

सुदाम : तुम्ही युरेनियमचा अंश असलेली काडतुसं वापरलीत, त्यांच्या अवशेषांमुळं -- विशेषत: मुलांमध्ये -- कॅन्सर पसरतोय !

पालव : जाऊं द्या ना आता ते ! तेच तेच किती वेळा बोलणार ! तुमच्या देशाचं, जनतेचं खूप नुकसान झालं ! आता पुढे बोला ! ( शांतता. )

सुदाम : बरं, आता काय विचार -- पुढे?

प्रेसिडेंट : तुम्ही तुमचा देश कंप्लीट ओपन ठेवायचा -- आम्ही कधीही इन्स्पेक्ट करणार -- तुझ्याकडे खूप डेंजरस अशी सामूहिक नाश करणारी रासायनिक आणि जैविक हत्यारं आहेत -- ती मानवजातीला घातक आहेत !

सुदाम : तू हे खोटं बोलतोयस हे तुला ठाऊक आहे -- आमच्याकडे असली हत्यारं आता मुळीच नाहीत ! पूर्वी होती हे खरं असलं तरी !

प्रेसिडेंट : तर त्या हत्यारांचे साठे आम्हाला नष्ट करायचे आहेत !

सुदाम : नसलेल्या हत्यारांचे?

प्रेसिडेंट : जैविक हत्यारांची एक गंमत सांगतो तुला -- ती कशी असतात तर माणूस त्यांच्या संपर्कात येताच त्याच्या रक्तात शिरून ती त्याच्या पेशींचा फडशा पाडतात ! -- हे ऐकून आमचा एक शास्त्रज्ञ म्हणायला लागला की असं काही अस्तित्वातच नाही ! म्हटलं भडव्या, तू आमचा शास्त्रज्ञ की त्यांचा? ज्ञान असं वापर की आपल्या देशाचा फायदा होईल ! ज्ञान वापरायचं कसं हेही कळलं पाहिजे रे !

सुदाम : म्हणजे आमच्याकडे अशी शस्त्रं आहेतच असं तुम्ही ठामपणे म्हणत राहणार ! ' हेरांचा रिपोर्ट '!

प्रेसिडेंट : नुसत्या लष्करी माणसाला डोकं थोडं कमी चालतं, पण तू एक राष्ट्राध्यक्ष आहेस ! हुशार आहेसच ! आणि एक लक्षात घे -- नुसतं खरं बोलणं, धूर्तपणा न करणं, प्रेमानं वागणं, शांत राहणं -- या पध्दतीनं कुठं कुठलं राजकारण चालतं का? -- तर नाही ! तसं चालू शकतच नाही ! अगदी स्वत:ला डावे म्हणवणाऱ्यांचंसुध्दा नाही !

सुदाम : समजा मी याला तयार नाही झालो तर?

प्रेसिडेट : पुन्हा -- पुन्हा थोडे हल्ले करावे लागणार ! तुला तुझी शक्ती एकवटायला वेळ देणं म्हणजे मूर्खपणाच

होईल तो आमचा !

सुदाम : दुसरा काही उपाय?

प्रेसिडेंट : काहीच नाही ! कायम तुझा देश आमच्यासाठी उघडा ठेवणं याला तू तयार न होणं हेच बरोबर आहे ! तू शांत राहा ! काही ठिकाणी आम्हाला हल्ले करायचे आहेत तेवढे करू आणि आम्ही निघून जाऊ ! सुमारे चार दिवस फक्त ! तुला धक्का लावणार नाही ! प्रॉमिस ! पुढेही -- सत्ता -- तुझीच !

सुदाम : एवढ्या वर्षांच्या दोस्तीचं हे फळ !

प्रेसिडेंट : मुख्य म्हणजे महत्त्वाकांक्षेचं रे ! ठीक आहे, चलू या ! तुलाही तुझ्या देशात कामं असतीलच ! ( सुदाम उठतात. पालवही उठतात.)

पालव : चल, मी येतोय तुझ्याबरोबर हॉटेलपर्यंत -- ( दोघेही जायला लागतात.)

प्रेसिडेंट : पालव, सावकाश हं, नीट घेऊन जा त्याला -- ( सुदाम वळून पाहतो पण सगळं चालवून घेणं भाग आहे असा चेहरा करून जातो. मागोमाग पालव जातात. प्रेसिडेंट सिगरेट शिलगावतात. इथे हे दृश्य संपते. गावकर आणि गायकर येतात.)

गायकर : चीनमध्ये, बरं का, चीनमध्ये म्हणे अंतर्गत मागणी कमी होतेय असं दिसायला लागलं की ते एक तर जोडून सुट्ट्या देतात किंवा लोकांचे पगार वाढवतात. त्यामुळं मग लोक सहलींना वगैरे जायचे बेत करतात आणि मग त्यामुळं सहल उद्योगातून -- टूरीझममधून -- अर्थव्यवस्थेला पुन्हा गती येते !

गावकर : एक कंजूष व्यापारी होता. त्याच्या बायकोला दोनच साड्या होत्या आणि त्या जुन्या झाल्या होत्या आणि फाटत आल्या होत्या. ती त्या व्यापाऱ्याला म्हणाली की या साड्या फाटल्यात, नवीन दोन साड्या आणा मला -- या साड्यांतून अंग उघडं पडतं -- खिडकीतून लोक बघतात -- मला बरं नाही वाटत ! त्या व्यापाऱ्याचं बायकोवर इतकं प्रेम होतं, की तिच्यामुळं दुसऱ्या कुणालाही, कसलाही -- तिच्याकडे बघण्याचासुध्दा -- आनंद झालेला त्याला चालत नसे ! त्याच्या याच वीकपॉईंटला तिनं हात घातला होता ! त्याशिवाय साड्या मिळणार नाहीत हे तिला माहीत होतं ! व्यापाऱ्यानं विचार केला आणि मग म्हणाला, बघू, आण त्या साड्या ! त्यानं उपाय असा काढला की दोन्ही साड्यांतले चांगले भाग कापून घेऊन ते जोडून त्याची एक चांगली साडी करायची ! ती वापर म्हणाला ! रात्री धुवून टाकायची आणि सकाळी पुन्हा वापरायची म्हणाला ! बायकोचा नाईलाज झाला ! थोड्या दिवसांनी ती तशी जोडवाली साडीही फाटली ! जुनीच होती -- फाटली ! बायकोनं तेच हत्यार पुन्हा वापरलं ! अंग उघडं पडतं -- खिडकीतनं लोक बघतात ! आता तरी दोन साड्या आणा म्हणाली ! व्यापाऱ्यानं विचार केला. बघू म्हणाला, आण ती साडी ! त्यातला चांगला भाग काढून तो म्हणाला याचा खिडकीला पडदा करून टाक ! झालं? खूष? आता तर नाही ना काही प्रॉब्लेम?

गायकर : मनुष्यजातच अशी हरामी आणि क्रूर असते का हो? असा प्रश्न एका जगन्मान्य विव्दानाला विचारला --

गावकर : ते बावचळलं ! हे मला काही सांगता येणार नाही म्हणालं ! पण माणूस जे काय आहे त्याच्यातूनच खूप चांगल्याही गोष्टी घडलेल्या आहेत आणि घडत राहतील असा मला विश्वास आहे म्हणालं ! आशावाद्‌च चांगला म्हणालं !

गायकर : मग पर्यावरणनाशानं मानवजात नष्ट होवो --

गावकर : की एकाचं प्रभुत्व मान्य करायला नकार दिल्यानं --

गायकर : एकूणच सगळयांचंच -- हे असलं जगणं म्हणजे मरणंच की हो !

गावकर : तर काय ! ( दरम्यान, इकडे एक वयस्कर आणि एक तरुण स्त्री शेंदरी रंगाच्या, लष्करी वाटाव्या अशा पोषाखात ग्लासेस, दारूच्या बाटल्या इत्यादी रेंज करताहेत. नाटकात असणाऱ्या त्याच दोन स्त्री कलाकारांनी ही कामे करावीत. )

गायकर : गावकर, काही तरी भारी कार्यक्रम दिसतोय !

गावकर : यस ! आता, आपण पाहिलेले महान लोक -- नेते -- एकत्र येणार आहेत ! एरवी हे असे एकत्र येतात तेव्हा आपण तिथे नसतो ! आता हे आपल्यासमोर घडणार आहे !

गायकर : मग, मला वाटतं आता आपली एक्झिट नको ! आपणही पाहू या !

गावकर : हे ठीकच होईल ! ( ते दोघेही एका कडेला जाऊन बसतात. क्षणभराने पंतप्रधान, जयवंत, प्रेसिडेंट आणि पालव येतात. जयवंत पुढे -- सगळयांना आणणे, बसायला सांगणे -- हे करतात. )

पंत : तुमचं ते इराकचं लफडं झाल्यावरच तुमची भेट हवी होती -- नाहीतर प्रत्येक वेळी आम्हाला अपराधी वाटत राह्यचा प्रॉब्लेम झाला असता !

पालव : तुम्ही कृतज्ञता, आपुलकी, दया ही तत्त्वं मानता म्हणून !

जयवंत : तुम्ही नाही आमच्या शेजाऱ्याबद्दल कृतज्ञता बाळगत?

पालव : तसं काही नसतं. तुमचा शेजारी घ्या, ईजिप्त घ्या, सौदी अरेबिया घ्या किंवा इराकच घ्या ! आमचा फायदा तुम्हाला मान्य असेपर्यंत आम्ही कृतज्ञ, प्रेमळ, मित्र वगैरे सर्व काही, नाही तर नाही !

जयवंत : बरं, ज्याच्या त्याच्या आवडीचं सगळं ठेवलेलं आहे बरं का -- आपण फक्त निवांत गप्पा मारायला जमलो आहोत -- जरा आता आमच्या पध्दतीनं चालू द्या -- मनाची घडी विस्कटल्याशिवाय दारू पिण्याचं महत्त्व आम्हाला वाटत नाही -- तसं होऊ द्या -- इथं कुणी पत्रकार नाहीत की तुम्ही काय बोलताय याचं रेकॉर्डिंग नाही ! -- तुमच्याकडे आल्यावर आम्ही तुमच्या पध्दतीनं चालतो की नाही?

प्रेसिडेंट : अरे, पंतांनी एवढं प्रेमानं बोलवलंय --

पंत : सावकाश पण भरपूर चालू द्या -- ( त्या दोन स्त्रिया ग्लासेस सर्व्ह करतात.)

जयवंत : मला कधीचं मनात आहे की प्रेसिडेंटना एकच प्रश्न विचारावा -- संपूर्ण मानवजात चांगली जगणं याबाबत त्यांची कल्पना काय आहे?

प्रेसिडेंट : आमचा फायदा होईल असं सगळयांनी जगणं हेच सगळयांचं चांगलं जगणं ! आणखी काय !

पालव : नाही, ते तर आहेच ! पण तुमचं काही स्वप्न -- आदर्श -- असं काही आहे का -- एकूण मानवजातीबद्दल -- असं विचारताहेत ते --

प्रेसिडेंट : त्या सगळया निरुपयोगी गोष्टी आहेत ! असली स्वप्नाळू माणसं खूप होऊन गेली !

जयवंत : मला स्पष्टपणे असं म्हणायचं आहे की तुम्ही लोकशाहीसाठी अमुक करता -- स्वातंत्र्यासाठी तमुक करता -- असं सारखं म्हणत असता तर शेवटी मानवजात अशा एखाद्या चांगल्या स्थितीला पोचेल असं तुम्हाला वाटतं का?

प्रेसिडेंट : माणसामाणसात, कशाला, प्रत्येक संबंधात संघर्ष आहे -- तर हा संघर्ष नाही असं होईल का? -- हाच आहे का तुमचा प्रश्न?

पंत : तुमचा प्रश्नच अध्यात्मिक आहे जयवंत -- भौतिक बोला -- संघर्ष असणारच आहे हे गृहीत धरा -- त्यातून काय चांगलं होऊ शकेल -- असं विचारा !

प्रेसिडेंट : भौतिक लेव्हलचे प्रयत्न तर चालूच असतात ! सगळयांचेच ! त्यातूनच चांगलं चांगलं घडत घडत आपण सध्याच्या अवस्थेपर्यंत आलो आहोत !

पंत : जयवंत, त्यांचा ॅप्रोच लक्षात घ्या ! सगळं भविष्यच जर माणसाला आजच कळलं तर काय उपयोग आहे ! असं नकळत प्रगती करत राहणंच महत्त्वाचं आहे !

जयवंत : पण काहीही असो, त्यांच्यात आणि आपल्यात एक समान दुवा आहे !

पालव : बोला, बोला --

जयवंत : काही लोक म्हणतात की हे एका धर्माविरुध्द आहेत पण हे म्हणतात की नाही, आम्ही फक्त मानवी हक्कांचा भंग करणाऱ्यांविरुध्द आहोत ! आपल्यालाही लोक असंच म्हणतात पण आपण म्हणतो की ते चूक आहे -- आम्ही फक्त देशद्रोह्यांविरुध्द आहोत !

पालव : असे गोंधळ तर होतच असतात ! आपण आपल्या प्रामाणिकपणानं पुढे जात राह्यचं !

पंत : पण प्रेसिडेंट काहीही म्हणा, एक्क्याण्णवला तुम्ही बॉम्बिंग करून इराकची वाट लावलेलीच होती -- शिवाय अत्यंत कडक, जाचक आणि गळा दाबल्यासारख्या निर्बंधांनी त्यांची उरलीसुरली ताकदही खलास झाली होती -- तरीही तुम्ही आत्ता अठ्याण्णवमध्ये पुन्हा चार दिवस कशाला बॉम्बिंग केलं त्यांच्यावर?

प्रेसिडेंट : अहो, हे साले पुन्हा त्यातल्या त्यात शक्ती एकवटत राहतात -- आपण आता एवढं सगळं केल्यावर हे मनातनं किती चवताळलेले असणार हे आपल्याला लक्षात ठेवावंच लागेल ना ! त्यांची आयडेंटिटी खलास होईपर्यंत त्यांना चेपावं लागेल !

पंत : जयवंत, ही आयडेंटिटी खलास होणं वेगळं -- अध्यात्मिक मुक्ती नव्हे ही -- ही भौतिक मुक्ती !

जयवंत : भौतिक मुक्ती तर खूप मोठ्या प्रमाणात प्रेसिडेंटकडेही आहेच ना ! मानवी भावभावना, संवेदना, करुणा, दया यांची बंधनंच नाहीत त्यांना !

पालव : च्यायला, चेष्टा करताय काय आमची?

पंत : पालव, मित्र म्हणून बसलोय आपण !

पालव : ते आहेच !

तरुण स्त्री : ( मधेच येऊन -- ) मला एक प्रश्न विचारायचा आहे तर विचारू का?

वयस्कस्त्री: अहो, ती म्हणत होती की जरा वेळानं विचारते -- म्हटलं नको, आत्ताच विचार -- जरा वेळानं म्हटलं तर ते तुला जास्तच प्रेमानं उत्तर देण्याची शक्यता आहे -- खरं उत्तर हवं असलं तर आत्ताच विचार -- तर ती काय म्हणाली --

तरुण स्त्री: अगं, मला चालेल जरा खोटं उत्तर -- नंतरच विचारते --

प्रेसिडेंट : अगं, आत्ताही विचार, नंतरही विचार -- खोट्या उत्तरासाठी फार तर आणखी एक प्रश्न विचार नंतर --

तरुण स्त्री: स्त्रियांबद्दल तुमचं काय मत आहे?

प्रेसिडेंट : चांगलं मत आहे ! एक स्त्री खतरनाक निघाली याचा अर्थ सगळया तशाच असतात असं नाही --

तरुण स्त्री: नाही, तसं नाही -- स्त्रियांना समानता मिळण्याबद्दल विचारतेय मी --

प्रेसिडेंट : मिळालीच पाहिजे समानता ! स्वातंत्र्य आणि समता हे तर मानवी हक्कच आहेत ! पालव?

पालव : आहेत ! पण दुर्दैवानं जगात कुठंही अजून तरी स्त्रीपुरुष समानता प्रस्थापित झालेली नाही --

पंत : आमच्याकडेही आहेतच हे प्रॉब्लेम्स --

पालव : पुरुष हा निसर्गत:च जरा आक्रमक आणि वर्चस्ववादी असावा -- शास्त्रीय परिस्थिती बघावी लागेल --

प्रेसिडेंट : मी जरा वेगळं मानतो -- प्रत्येक जिवंत व्यक्ती ही वर्चस्ववादीच असते -- स्त्री असो की पुरुष -- परिस्थिती पाहून प्रत्येकजण मार्ग ठरवतो -- परंतु, मी स्त्रियांची बाजू मान्य करतो -- त्यांची मागणी बरोबर आहे --

पालव : बरोबर आणि सगळयांना मान्य होणाऱ्या गोष्टींना आम्ही कधीच विरोध करत नाही -- चांगल्या गोष्टींना आम्ही विरोध केल्याचं एकही उदाहरण नाही --

जयवंत : मला एकजण म्हणत होता की असं तुम्ही केलं तरी त्याबद्दल खरं बोलायची कुणाची हिंमत होत नाही !

पालव : ( हसून -- ) आयला, चढायच्या आधीच खरं बोलायला लागला का काय तुम्ही !

गावकर : ( एका बाजूला -- ) म्हणजे चढल्यावर प्रेसिडेंट खोटं बोलतील ही अपेक्षा आहे तर चढल्यावर हे मात्र खरं बोलणारे !

पंत : बरं, ते जाऊ द्या -- मघाशी तुम्ही संघर्ष होणारच असं सांगत होता --

प्रेसिडेंट : काय घडावं याच्यावर प्रत्येकजण ताबा ठेवायचा प्रयत्न करतो की नाही? आणि प्रत्येकाची इच्छा

वेगवेगळी असते की नाही? मग संघर्ष होणार नाही असं कसं होईल?

पंत : मग मार्क्सनं जर म्हटलं की मालक आणि कामगार यांचे स्वार्थ वेगवेगळे असतात आणि त्यांच्यांत संघर्ष होणारच तर मग ते बरोबरच होतं म्हणायचं मग !

प्रेसिडेंट : भांडवलवादामुळं मालक हा कामगारांना लुटत असतो असं त्याचं म्हणणं होतं -- याच्यावर बोलायच्या आधी मी असं विचारतो की हा भांडवलवाद कुठनं आला बाबा? भांडवलवादाच्या आधीही माणूस वाईटच असला पाहिजे ! चांगल्यातून वाईट कसं निघेल?

जयवंत : माणूस आधी चांगला होता का -- की वाईटच होता -- याबद्दल हे भडवे काहीच बोलत नाहीत ! बरं, वाईटच होता म्हणावं तर मग नुसताच भांडवलवादाला दोष देण्यात पॉईंट उरत नाही -- आणि त्याच्या पुढं म्हणजे भांडवलवाद गेल्यावर ' चांगलं ' होणार आहे -- हेही तर्काला धरून होत नाही --

प्रेसिडेंट : तर्क हजार प्रकारांनी वापरता येतो -- मार्क्सनं लोकांना वेडे बनवलं ! तो प्रामाणिकही असेल ! पण वेडा प्रामाणिक ! त्याला पाहिजे त्या पॉईंटपासून तो तर्क सुरू करणार आणि त्याला पाहिजे तिथं थांबणार !

पालव : मी एकाला विचारलं होतं की आधी आदर्श परिस्थिती निर्माण होईल आणि मग जगणं चांगलं होईल असं तुम्हाला वाटतं की काय? आणि अशी आदर्श परिस्थिती म्हणजे काय तर फक्त भांडवलवादी रचना नष्ट होणं ही? माणूस मुळातच जर वाईट असेल तर आदर्श परिस्थिती कशी तयार होईल?

जयवंत : भौतिकवर आपली फार मास्टरी आहे असं त्यानं - मार्क्सनं - दाखवलं - इतिहासाचं अर्थशास्त्रीय विश्लेषण !

पंत : वाढत्या भांडवलवादामुळं आपोआपच कामगारांत अन्यायाची भावना आणि दु:ख वाढत जाईल आणि भांडवलवादी रचना उलथून टाकली जाईल असं त्याचं म्हणणं होतं. जिथं खाजगी मालकी गेली तिथं संपले संघर्ष? उलट आता तर यांच्याच लोकांनी यांनाच चेपायची -- पिळवणूक करायची – चिरडायची पध्दत सुरू झाली ! इथपर्यंत पोचणंही सगळया देशांत घडलं नाही -- करा मग वेगळं विश्लेषण !

प्रेसिडेंट : एकजण म्हणाला की म्हणे मार्क्सवाद हा मानवी प्रश्न सोडवण्यासाठी नाहीच आहे -- तो फक्त अशा मानवी प्रश्नांना तुम्हाला तोंड देता यावं अशी परिस्थिती तयार करण्यावर भर देतो !

पालव : आधी आदर्श परिस्थिती तयार करायची आणि मग मानवी प्रश्नांना तोंड द्यायचं -- यांच्या बापानं केलं होतं असं कधी !

जयवंत : पण एक मोठा सामाजिक प्रश्न सोडवायचा त्यानं प्रयत्न केला असं म्हटलं तर? का करू नये असं?

पंत : अहो जयवंत, एखादा एखादा संघर्ष दुरुस्त करताही येतो हो थोडाफार पण तोपर्यंत आणखी हजार अन्यायांची भर पडलेली असते जगण्यात ! एकच संघर्ष केंद्रीभूत धरून सगळं जगणं नीट होईल ही कल्पनाच भ्रामक आहे ! तुम्हाला महत्त्वाचा वाटणारा संघर्ष तुम्ही दुरुस्त करत बसायला काहीच हरकत नाही -- पण ते झालं की पूर्ण जगणं आदर्श होणार आहे हा भ्रम पेरू नका ! जगणं संघर्षमय

राहणं टळूच शकत नाही ! ( इथे तरुण स्त्री काही बोलायला पुढे येऊ पाहते पण वयस्क स्त्री तिला थोपवते. )

पालव : आणि आता तर जगात भांडवलवादाचाच प्रभाव उलट वाढतच चाललाय ! यांचं सगळं विश्लेषण बोंबललंय ! मग साले नुसती विश्लेषणं बदलत बसतात !

प्रेसिडेंट : बरं, जगात कुठंच तशी आदर्श परिस्थिती निर्माण होऊ शकली नाही आणि त्यामुळं, त्यातून निर्माण होणारा चांगला माणूस आपल्याला अजून बघायलाही मिळाला नाही !

पालव : बरं दुसरं एक बघितलं की बाबा तेही भौतिक पध्दतीनं जाणारेच होते आणि आमचे प्रेसिडेंटही तसेच आहेत -- तर मग यांना वेगवेगळे मार्ग का दिसतात? आणि त्यांचाच मार्ग बरोबर म्हणावा तर तेही इतके क्रूर आणि हिंसक का होतात?

पंत : दडपणारे आणि दडपले जाणारे हे दोनच वर्ग खरं तर जगात आहेत -- पती-पत्नी, मालक-मजूर, बाप-मुलगा, नेता--सामान्य माणूस, मित्र-मित्र, मित्र-शत्रू, -- अशा हजारो नात्यांत हेच सत्य आहे ! यांतल्या एकाच अन्यायाच्या प्रश्नामुळं बाकीचे सगळे अन्याय अस्तित्वात आहेत असं म्हणणं म्हणजे बालिशपणाचा कळस आहे ! मग तो मुख्य अन्याय तरी का आणि कसा अस्तित्वात आला बाबा?

जयवंत : आता यांचा देश विकसित आहे -- आपल्याइतका आर्थिक प्रश्नांनी ग्रासलेला नाही तरीही तो भयग्रस्त आहे -- त्याचं काय करायचं?

पालव : गाडी घसरायला लागली तुमची जयवंत !

पंत : बरं, ते सगळं जाऊ द्या -- मला एकच सांगा -- सगळयांचं भलं व्हावं अशी इच्छा करण्यात काही अर्थ आहे की नाही? आमच्या धर्मातही अशी एक प्रार्थना आहे?।

प्रेसिडेंट : कदाचित सगळया धर्मांतही असेल ! जरूर सगळयांच्या भल्याची इच्छा करावी पण एक भौतिक अट सांभाळून ! -- आपलं प्रभुत्व राहिलंच पाहिजे ! नाहीतर काय होईल? -- नेते बदलतील -- पिळवणूक करणारे फक्त वेगळे येतील ! बास !

जयवंत : इथं जरा मी एक मिनिट घेतो हं ! यज्ञ झाला होता, पंगत बसली होती -- श्रीकृष्णानं धर्मराजाला म्हटलं की या पंगतीत फीर आणि मला सांग की यात वाईट माणसं किती आहेत -- दुर्योधनाला हाच प्रश्न जरा वेगळया प्रकारे विचारला की यात चांगली माणसं किती आहेत -- दोघंही फिरून आले -- दोघांचंही उत्तर एकच होतं -- एकही नाही ! -- आता अध्यात्मिक स्तरावर धर्म पाहात होता की या सगळयांचा अहंकार ही खोटीच गोष्ट आहे आणि भौतिक स्तरावर कदाचित दुर्योधन पाहात होता की अहंकार हीच फक्त खरी गोष्ट आहे ! आता आजच्या काळाच्या संदर्भात बघायचं झालं तर दुर्योधनच खरा ठरतो ।

प्रेसिडेंट : तोच जास्त खरा होता ! त्याचंच फक्त आपल्याला पटणं शक्य आहे ! 'चांगला माणूस ' ही नुसती कल्पनाच नव्हे तर अशक्यप्राय गोष्ट आहे ! कारण माणसाचं मनच भांडवलवादी आहे -- ते सतत

काही ना काही जमा करत असतं -- अन्याय, सुख, दु:ख, मान, अपमान, वगैरे ! अशा मनानं भांडवलवादाविरुध्द काय कारवाई होऊ शकणार आहे !? ( इथे पुन्हा तरुण स्त्री काही विचारु पाहते पण वयस्क स्त्री ‘ आपल्याला -- फक्त माफक सहभाग असू द्या ! -- अशी ऑर्डर आहे ! ‘ असे म्हणून थोपवते. )

पंत : पण तरीही खूप बुध्दिमान लोकांना असं वाटतं की जगाला डाव्या विचारसरणीचीच खरी गरज आहे !

प्रेसिडेंट : ते खरंही आहे पंत ! पण फक्त काल्पनिक लेव्हलवर ! भांडवलदार मालकांच्या जागी दुसरे लोक येणार -- नेते ! सत्ताधारी ! पण जे कामगार म्हटले गेले ते कायम दडपलेच जाणार ! ही गोष्ट बुध्दिमानांच्या डोक्यात येत नाही ! आणि काही वेळी कामगारांच्याही !

पंत : कामगार म्हणजे ज्यांच्यांत नेते होण्याची किंवा दुसऱ्यांना दडपण्याची कुवत नाही ते !

प्रेसिडेंट : अर्थातच ! आणि पुन्हा तेच ! मन ! माणसाचं मनच मुळात उपभोगवादी आहे ! त्याला आळा घातला जावा -- तळागाळातल्या लोकांचा - गरीबांचा विचार व्हावा - असंही तेच मन म्हणतं ! प्रभावी काय ठरेल? मला तरी कुठं सुखाचं आहे हो हे असलं जगणं !? पण निवड तर हीच करावी लागणार !

जयवंत : ज्याच्यात्याच्या कुवतीप्रमाणे काम घेणे आणि ज्याच्यात्याच्या गरजेप्रमाणे पूर्तता करणे याचा अर्थ काय मग?

प्रेसिडेंट : भ्रामक घोषणा, जयवंत, घोषणा फक्त ! याला विरुध्द निवड लागते आणि खूप सक्ती लागते ! शिवाय याला आमचं पत्थरदिल आव्हान असतं !

पंत : तुमच्यावर तर प्रेसिडेंट आख्खं जग अवलंबून आहे -- सध्या माझ्यावर समजा काही भाग फक्त जगाचा -- काही कोटी माणसं -- तर आपली करेक्ट म्हणजे बरोबर कृती कोणती -- हे कसं ठरवायचं?

प्रेसिडेंट : सिंपल ! आपल्याला कळणारा आपला आणि आपल्या देशाचा फायदा ! आर्थिक बरं का ! नुसते डावे लोकच आर्थिक प्रश्नांना महत्त्व देतात असं काही नाही !

वयस्क स्त्री: ( पुढे येऊन -- ) प्रेसिडेंट, तुम्ही खूप निराशावादी आहात?

प्रेसिडेंट : छे, छे -- आम्हीच राहणार सुपर-पॉवर -- कायमच !

वयस्कस्त्री: त्याबद्दल नव्हे -- एकूणच -- माणसाच्या जगण्याबद्दल -- कुणालाच साधं -- छान जगणं शक्य नाही? खरं तर जगात खूप संपत्ती आहे -- कुणाचाच छळ व्हायची गरज नाही -- तरीही --

पालव : हे सगळं प्राथमिक शाळेतलं आहे ! माणूस समजायला लागल्यावर असलं कुणी बोलत नाही !

गायकर : म्हणजे निराशावादच ! हिंदू धर्म हा माणसाला आनंदाच्या दिशेनं नेतो !

गावकर : समाजवाद हा भौतिक जगात -- इथंच -- आनंद निर्माण करतो ! -- याच्याइतकं आशावादी काहीच असू शकत नाही --

गायकर : तीच चाललीय ना चर्चा ! काय झालं? !

तरुण स्त्री: ( पुढे येऊन -- ) विचारतेच मी आणखी एक प्रश्न ! -- माझ्या असं लक्षात येतंय की आपल्या जगण्यात आर्थिक प्रश्न किंवा एखादा महत्त्वाचा संघर्ष हे काही केंद्रस्थानी नाहीच आहे ! -- केंद्रस्थानी आहे ती फक्त आपल्या मनाची संघर्षमयता ! आणि केंद्रस्थानी असलेल्या या मनाच्या संघर्षमयतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्षच करायचं असं आपण सगळयांनी ठामपणे ठरवलेलं आहे ! त्यामुळंच तर आपल्या जगण्यातून हा सगळा कचरा निर्माण होत नसेल ? ( भयाण शांतता. वयस्क स्त्री तिच्या जवळ येऊन तिच्या खांद्यावर हात ठेवते. )

वयस्कस्त्री: अगं, जाऊं दे ! हा नको प्रश्न ! सगळा रंगाचा बेरंग होईल !

प्रेसिडेंट : नाही, नाही, तसं काही नाही --

पंत : विचारू द्या हो --

गायकर : बरं, ठीक आहे, चला, अशी हुशारी कितीही केली तरी फारसा फरक पडत नाही, हे तर वारंवार सिद्ध होत आलेलं आहे ! इथं एक शेवटचा कौटुंबिक सीन आहे, तो पाहू या, कारण नंतर मात्र --

गावकर : नंतरचं नंतर ! चला ! ( हे दृश्य इथे संपते. आता अद्वैतांच्या घरातले दृश्य. प्रकाश, सरस्वती आणि वेदांग तिघे बसलेले. जरा सुन्न वातावरण. )

वेदांग : आता क्रियाकर्म आटोपलेलं आहे, ही माहेरी गेलेली आहे आणि काही गोष्टी बोलायच्या आहेतच, म्हणून बोलतो ! मला अजिबात दु:खबि:ख झालेलं नाही, आणि तुम्हीसुद्धा आवरतं घ्या आता -- इतकं दु:ख माजवत बसायची त्याची लायकी नव्हती !

सरस्वती : ( रडत -- ) किती झालं तरी मुलगा होता तो आमचा --

वेदांग : प्रेत तरी बघायला मिळालं का ? फक्त प्रियानं तिच्या आईवडिलांना पत्र लिहिलं आणि ते सांगायला आले म्हणून कळलं तरी ! व्याह्यांची पहिली भेटच या असल्या मृत्यूच्या बातमीमुळं ! जगात कुठंच घडलं नसेल असं ! एरवी त्यांना आपल्याबद्दल कवडीची आपुलकी नव्हती, प्रियानं कळवायला सांगितलं म्हणून ते आले ! काय म्हणाले शेवटी ? ’ आमच्या मुलीच्या आयुष्याचं वाटोळं झाल ! ’ -- हेच ना ?

प्रकाश : त्यांचं प्रेम काय आपण जुळवून दिलं होतं का ?

सरस्वती : ( पुन्हा रडत -- ) मुलगा गेला माझा --

वेदांग : अरे पण त्याचं असं काहीतरी होणार हे माहीतच होतं मला तरी -- ’ एकमेकांच्या मारामारीत मारला गेला ’ -- म्हणजे काय ? टोळीयुद्ध टाईप असणार काहीतरी ! दाद ना फिर्याद ! नाहीतरी पळून जाऊन सात वर्षं झाली तेव्हाच तो कायद्याच्या दृष्टीनं मृत झालेलाच होता !

प्रकाश : त्यांच्या मुलीला ओमनं भुलवलं असंच वाटतं त्यांना ! तिचा काहीच दोष नव्हता !

वेदांग : ते जाऊं द्या आता ! ते सांगायला आले हा त्यांचा मोठेपणाच म्हणायला पाहिजे, हे लक्षात ठेवा !

मरणोत्तर गती तरी मिळेल आता तुमच्या मुलाला ! मनात राग धरून ते आलेच नसते तर ?

प्रकाश : प्रिया बाकी कुठं आहे, मूलबाळ आहे का, हे काहीच कळलं नाही !

सरस्वती : त्यांनाही माहीत नाही, म्हणाले ना ते --

वेदांग : माहीत असेल नाही तर नसेल, तो अध्याय संपला ! आता त्याचं नावही नकोय घरात ! बदनामी नुसती !

प्रकाश : जी व्हायची ती होऊनच गेलीय आता बदनामी ! आता काय घाबरायचंय !

वेदांग : आणि ' काय लाजायचंय ? ' -- असंही म्हणा की !

प्रकाश : ( चिडून -- ) होय, तेही म्हणतो ! हा जरा कमी शिकलेला होता म्हणून असा गेला -- शिकलेल्यांचं काय चाललं आहे ? रोज कशानं भरतायत वर्तमानपत्रं ?

वेदांग : लाजू तर नकाच, अभिमान बाळगा !

प्रकाश : मोठे लोकच त्यांची अनैतिकतासुद्धा अभिमानास्पद करू शकतात ! आपण नाही !

सरस्वती : आता जायचा तो गेला -- तुम्ही कशाला वाद घालताय ? आपल्याला तर एकत्र राह्यचंय ना ?

वेदांग : जगभर हेच चाललंय म्हटल्यावर, बरोबरच म्हणायचं सगळं !

प्रकाश : शेवटी पॉवरचा कायदा खरा ! कुठंही !

वेदांग : या सगळयांना असला हा हावरटपणाचा रोग आणि माझ्यासारख्यांना त्यांचा राग बाळगायचा रोग ! रोगट सालं सगळं !

प्रकाश : आपण ठरवतो का ही जगरहाटी ? परमेश्वराला तरी माणसाच्या जगण्यात ही दु:खं पेरायचं काय कारण होतं ? आपोआप त्याला अक्कल येईल असं नसतं करता आल ?

वदांग : विचार त्याला -- ( सरस्वती पुन्हा रडते ... )

गावकर : आता हा सीन आवरता घ्या -- कारण - कारण -- आता -- अकरा सप्टेंबर दोन हजार एक --

गायकर : बाप रे ! -- ( इथे हे दृश्य संपते. सगळे जातात. गायकर, गावकर पुन्हा येतात.)

गायकर : हॉरिबल ! अकरा सप्टेंबर दोन हजार एक ! आख्खं जग हादरवून टाकणारा दिवस !

गावकर : योगायोगानं त्या घटनेचं शूटिंगही झालं ! कल्पनाशक्तीच्याही पलीकडची म्हणावी अशी घटना !

गायकर : इतकी ताकदवान हेर यंत्रणा, इतकं अभेद्य सुरक्षाकवच, आणि देशाच्या शक्तीचा इतका प्रचंड धाक -- हे सगळं ओलांडून ही घटना घडवली जाणं म्हणजे काय धाडस असेल, कसलं प्लॅनिंग असेल ! एकाच वेळी त्याच देशाची विमानं पळवून जगप्रसिध्द इमारतींवर धडकवणे ! विमानं वर्ल्ड ट्रेड सेंटरवर धडकणे, पेटणे, पलीकडून बाहेर पडणे आणि हळूहळू इमारतीचा डोलारा कोसळत जाणे ! दोन प्रचंड इमारती !

गावकर : दोन महाप्रचंड इमारतींचे कोसळणे ! हजारो माणसे मृत्यूमुखी पडणे, अगणित माणसे जखमी होणे !

देशाची इज्जत आणि इभ्रत धुळीला मिळणे ! व्हाईट हाऊस आणि पेंटॅगॉनवरचीही अशीच कारवाई यशस्वी झाली असती तर ! ( दोघेही जातात. प्रेसिडेंट येतात. फक्त प्रेसिडेंटवर स्पॉट --)

प्रेसिडेंट : प्रथम मृतांबाबत शोक आणि जखमींबाबत सहानुभूती व्यक्त करतो. ही क्रूर आणि निंद्य घटना घडवणारे कोण आहेत ते आम्हाला माहीत आहे. त्यांचा नायनाट केल्याशिवाय आम्ही राहणार नाही. त्यांना वाटत असेल की त्यांना यश मिळालं आहे ! पण याची त्यांना जी किंमत मोजावी लागेल ती याच्या कैक पटींच्या हानीची असेल ! आम्ही असली अतिरेकी कृती मुळीच खपवून घेणार नाही ! ज्या ज्या व्यक्ती, देश, संघटना हे घडवण्याला साह्यभूत झाल्या असतील त्या सर्वांना आम्ही धडा शिकवू ! ओसामा बिन लादेन तर याच्या पाठीशी आहेच ! आणि सध्या तो अफगाणिस्तानात आहे ! अफगाणिस्तानाकडे आम्ही लौकरच पाहून घेऊ ! आणि अर्थातच इराक ! इराककडेही पाहावं लागेलच ! आता आम्ही स्वस्थ बसणार  नाही ! हे आम्हाला दिलं गेलेलं आव्हानच आहे असं आम्ही समजतो ! हे आव्हान पुरतं ठेचून काढण्याची क्षमता आमच्यात आहे ! आम्ही ती वापरूच ! आता हे जगातल्या दहशतवादाविरुध्दचं युध्द आहे ! यासाठी जास्तीत जास्त देशांचं सहकार्य आम्ही मिळवू ! यापुढे, आम्हाला समर्थन न देणं म्हणजे दहशतवाद्यांना समर्थन देणं असं समजलं जाईल । ( इथे हे दृश्य संपते. गायकर, गावकर येतात.)

गावकर : यांना दहशतवादाचा धक्का बसल्यावर हे लगेच कृतीलाच उद्युक्त झाले, पण वर्षानुवर्षं आपण हेच असेच प्रकार सहन करत असूनही आपल्याला मात्र हे संयम पाळण्याचा सल्ला देत राहिले ! -- हे इथल्या लोकांना नुसतं जाणवलं असं नाही तर अनेकांनी याला उघड वाच्यताही दिली !

गायकर : मानवजातीच्या एकूणच जगण्यावर परिणाम करणाऱ्या या गोष्टी आहेत याचं भान वाढत चाललं !

गावकर : जागतिकीकरण, मुक्त व्यापार आणि दहशतवादाचा प्रश्न !

गायकर : कोणत्या हत्यारांनी अर्थशास्त्राला एकूण परिस्थितीवर ताबा ठेवता येईल हे सगळं धूसर झालं !

गावकर : अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या माणसाच्या मूलभूत गरजा समजून यांसाठी योग्य ती क्रयशक्ती प्रत्येक माणसाकडे असलीच पाहिजे -- असा पाया असलेलं अर्थशास्त्र हवं आहे !

गायकर : यापुढे आमीष दाखवायचं ते पैशाचं किंवा संपत्तीचं नव्हे तर जिवंत ठेवण्याचं !

गावकर : अकरा सप्टेंबरची झळ पोचलेले म्हणाले की आमचं रुदन हे युध्दाला आवाहन नाहीय !

गायकर : बाजारपेठांचा विस्तार, भांडवलाचा मुक्त संचार, आणि बौध्दिक संपदेच्या अधिकाराचा प्रश्न -- एवढंच नाही तर अमर्याद उपभोगाचं तत्त्व हे जागतिकीकरणाचं वैशिष्ट्य आहे. आणि हे जर बहुसंख्य लोकांना भुरळ घालत असेल तर याबाबतच्या विरोधाला ताकद कितपत राहणार?

गावकर : भ्रष्टाचार, हेरगिरी, पक्षफंड, दुसऱ्या पक्षांचे उमेदवार विकत घेणे इत्यादी खर्च बजेटमध्ये नसतात !

गायकर : प्रेसिडेंट म्हणतात की इतरांची असतात ती अंदाजपत्रकं -- आमचं असतं ते खात्रीपत्रक ! -- आम्ही

परिस्थिती आम्हाला हवी तशी वळवून घेऊ शकतो !

गावकर : सगळयांनीच अशी खात्रीपत्रकं तयार करायची असं ठरवलं तर माणसाचे आर्थिक प्रश्न कोणते असतील?

गायकर : तर ते सगळं असो ! सुरुवात अफगाणिस्तानपासून झाली ! तालिबानी राजवट उखडून फेकली गेली । आणि आता इराक !

गावकर : पण हे युध्द इराकविरुध्द नसून सुदामविरुध्द आहे असं जाहीर करण्यात आलं !

गायकर : इराकच्या जनतेवर सुदामच्या हुकूमशाहीची जुलुमी पकड घट्ट असल्यामुळे तीतून त्या जनतेला मुक्त करणं आणि त्यांना लोकशाही बहाल करणं हे अत्यंत महत्त्वाचं असल्याचं ठरवण्यात आलं.

गावकर : निरनिराळया देशांचा पाठिंबा आणि सहभाग मिळवण्याचे प्रयत्न सुरू झाले.( पालव येतात. फोन करतात.)

पालव : ( फोनवर -- ) हॅलो, जयवंत ! हं, मी पालव बोलतोय ! मला जास्त बोलत बसायला वेळ नाहीय - मी बोलतोय ते फक्त ऐका ! तुमचं आणि माझं दोन्ही मीच बोलतोय ! हं ! तर मी तुम्हाला विचारलं की तुमचंसैन्य पाठवता का तर तुम्ही म्हणालात की युनोत काय ते ठरू द्या ! तुम्हाला इराकबद्दल कृतज्ञाताही ठेवायची आहे आणि आमचंही मन मोडायचं नाहीय आणि दिसायला तर रीतसर दिसायला हवंय आणि एक प्रकारे हल्ला करायला तुम्ही राजी नाही असाही याचा अर्थ कळू शकतो ! बरोबर? हं ! म्हणूनच आपले दोघांचेही संवाद मीच बोललो ! तुमच्यात तेवढी ताकद नाही हे समजून असतो रे आम्ही ! पण तुम्ही एवढेही कमकुवत नाही की आम्ही तुम्हाला चेपू शकू ! पण त्याचबरोबर, युनो आमच्या हातात आहे हे लक्षात ठेवा ! आम्हाला वाटलं तर तुमच्या कुठल्याही बाबतीत आम्ही घुसू शकतो ! आता तर ते शक्य आहेच ! त्यामुळं तुमचा हा नैतिक आणि कायदेशीर स्टँड जरी आम्ही समजून घ्यायला तयार असलो तरी जास्त काही नादी लागायचं नाही आमच्या -- हे तुम्हीही जरा समजून राहालच ! असो ! मैत्रीत हो सगळं ! अच्छा ! ( जातात. )

गावकर : युनोला न जुमानता इराकवर हल्ले झाले ! हजारोंचा नाश करणारी जैविक आणि रासायनिक हत्यारं त्यांच्याकडे आहेतच आणि शिवाय अल-कायदा या अतिरेकी संघटनेशी त्यांचे संबंध आहेत हे जाहीर करण्यात आलं !

गायकर : लोक मनात म्हणाले की खरं तर या भडव्यांकडेच जगातली सर्वात विनाशकारी अस्त्रं प्रचंड प्रमाणात आहेत ! -- पण सगळे गप्प बसले !

गावकर : युनोची समिती इराकमध्ये जाऊन तपासणी करून आली पण त्यांना काहीही सापडलं नाही ! उलट त्या समितीच्या सदस्यांनी इराकमध्ये हेरगिरी केली असा नंतर इराकनं आरोप केला !

गायकर : इराकचा अल-कायदाशी संबंध असल्याचाही पुरावा मिळाला नाही !

गावकर : तरीही हल्ले करून इराकची उरलीसुरली वाट लावण्यात आली !

गायकर : सुदामही क्रूर म्हणून कुप्रसिध्द असल्यामुळं आणि हे युध्द त्याच्याविरुध्द असल्यामुळं फारसा सहानुभूती, दया, करुणा यांचा संबंध आला नाही !

गावकर : एवढं सगळं करूनही इराकवरचे आरोप मुळीच सिध्द झाले नाहीत !

गायकर : या खेपेच्या बॉम्ब हल्ल्यांत सुदामचा राजवाडा उद्ध्वस्त झाला आणि त्यात त्याचा एक मुलगा मारला गेला.

गावकर : सुदामचा एक प्रचंड पुतळा दोऱ्या बांधून इराकच्या लोकांनी खाली पाडलेला सगळया जगानं टीव्हीवरून पाहिला !

गायकर : लोकशाही बहाल होईपर्यंत सैनिक तिथंच राहतील असं सांगण्यात आलं !

गावकर : सुदामचा कसून शोध घेणं चालु राहिलं !

गायकर : कुर्द लोक सुदामचे कट्टर शत्रू होते -- शेवटी तो त्यांच्या तावडीत सापडला -- त्यांनी त्याला गुंगीचं औषध पाजून प्रेसिडेंटच्या सैन्याच्या हवाली केलं !

गावकर : शेवटी, प्रेसिडेंटच्या इच्छेमुळं सुदामला त्यांच्यासमोर हजर करण्यात आलं -- ( प्रेसिडेंट आणि पालव बसलेले. दाढी वगैरे झालेला पण केस खूप वाढलेला सुदाम येतो. त्याचे हात मागे बांधलेले आहेत. सावकाशपणे येतो आणि बसतो. क्षणभर कुणीच काही बोलत नाही.)

प्रेसिडेंट : तू तुझा डुप्लीकेट नसून ओरिजिनलच आहेस याची आम्हाला खात्री पटलेली आहे !

सुदाम : मला हे आधीपासूनच माहीत होतं --

प्रेसिडेंट : तुझे डीएनए तपशील आमच्याकडे होते, तुझ्या मुलाचेही होते - आणि आताचा हा तू -- सगळं मॅच झालं आहे !

सुदाम : मी ओरिजिनल आहे असं म्हणायचं आणखी एक कारण आहे -- ( प्रेसिडेंट प्रश्नार्थक पाहतात --) माझे राग, प्रेम, व्देष, सूडभावना, माझ्या लष्करी सवयी, माझी जिद्द, माझी लढाऊ वृत्ती, मला विरोध करणाऱ्यांना खतम करण्याची माझी इच्छा -- हे सगळं याच शरीरात आहे !

प्रेसिडेंट : ( हसून -- ) बरोबर आहे ! खरं ओरिजिनल तर तेच आहे सगळं ! आम्ही जरी लोकशाहीवाले असलो तरी माझंही ओरिजिनल जवळपास तसंच आहे रे !

पालव : पण प्रेसिडेंट जरा जास्त ओरिजिनल आहेत एवढंच !

सुदाम : मला इथं कशासाठी आणलंय?

प्रेसिडेंट : अरे एके काळचे मित्र आपण -- भेटणं गरजेचं वाटलं मला -- आपण एकमेकांना समजून घ्यायलाच हवं --

सुदाम : हे युध्द तर माझ्या विरोधातच होतं !

पालव : तसं नाहीय ते !

प्रेसिडेंट : आम्ही काय म्हणतो याच्यावर जाऊ नकोस -- तुला खलास करणं हा काही एवढा मोठा प्रॉब्लेम आहे का?

सुदाम : आमच्यात आता श्वासोच्छ्वासाचीही ताकद राहिलेली नाही -- आम्ही पाडले तुमचे टॉवर्स?

प्रेसिडेंट : तो प्रश्न नाही ! आमची हानी व्हावी, आमचा सूड घ्यावा असं वाटू शकणारे कोण कोण आहेत?! तुम्ही नाही त्यात?

पालव : आहातच ना, तुम्हीही !

प्रेसिडेंट : कुणीही आमच्या नादी लागलं तर आम्ही विध्वंस करणार -- आम्हाला जे आमचे शत्रू वाटतील त्यांचा ! -- त्यांनीच हे केलं असं आम्ही गृहीत धरणार ! हे लक्षात घेऊनच यापुढं आमच्याशी वागायचं -- कुणीही ! आमचा एवढा नाश केल्यावर आम्ही स्वस्थ बसलो असं आम्ही कदापीही होऊ देणार नाही ! हा धडा जगात उभा करणं महत्त्वाचं होतं !

सुदाम : बरं, आता?

प्रेसिडेंट : आता काय? तुझी सद्दी संपली ! आता लोकशाही पध्दतीनं आलेली आणि आमच्या आज्ञेत राहणारी अशी राजवट येईल तुझ्या देशात !

सुदाम : माझं काय?

प्रेसिडेंट : तुझ्यावर खटला चालवावा लागेल ! तुझ्याच देशात । आम्ही नुसती मदत करणार ।

पालव : शिक्षेचं काय ते तिकडंच ठरेल ।

सुदाम : पण --

प्रेसिडेंट : तू काळजी करू नकोस -- तुझे आम्ही कसलेही हाल करणार नाही -- मजेत राहा -- ऐष कर -- तुला हवं ते मिळेल ! तुझ्यामुळं आमचा खूप फायदा होणार आहे ! म्हटलं तर तुमच्या तेलावरही ताबा आला, म्हटलं तर इतरांनाही आमच्याशी कसं वागावं याची समज यायला मदत झाली !

पालव : तुमची सोय चांगली केलीय -- थोडंसं कटिंग -- म्हणजे हेअरकटिंग वगैरे केलं तरी चालु शकणार आहे --

प्रेसिडेंट : आणखी काही इच्छा?

सुदाम : मला कादंबरी ल्याह्यचीय !

पालव : कादंबरी?

सुदाम : होय -- माझ्याच आयुष्यावर आधारीत --

प्रेसिडेंट : ( हसून -- ) आम्ही असणार काय त्यात?

सुदाम : त्यात तीन प्रमुख व्हिलन असतील --

प्रेसिडेंट : कोण कोण?

सुदाम : तुम्ही, तुमचं लाचार मांजर असलेल्या देशाचा पंतप्रधान आणि इस्रायलचा पंतप्रधान --

प्रेसिडेंट : चालेल चालेल ! लिही ! तुला हा विरंगुळा तर चांगला होईलच पण मुख्य म्हणजे आम्ही कसे आहोत हे तुझ्या दृष्टीतून जगाला कळावंच ! छान होईल ! -- पालव, याला कागद, पेन काय लागेल ते द्यायची व्यवस्था करा -- फक्त एकच -- वर्तमानपत्रं, टीव्ही, सगळी माध्यमं -- हे बंद ! आता याचा जगाशी संपर्क तोडून टाका ! बाकी याला ऐष करू द्या !

सुदाम : हे तर माझं आयुष्य संपवणंच झालं ! एक दिवस असा येईल की तुमचीही अशीच अवस्था होईल -- आत्ता माझी आहे अशी ! --

प्रेसिडेंट : शिव्याशापांचा मला कंटाळा आहे बाबा ! मी त्यांच्याकडे लक्षही देत नाही ! पण तुला मी दोष देत नाही ! एवढं तर तू करणारच !

पालव : उपयोग नाही पण त्याचा काही --

प्रेसिडेंट : आता तुझ्या देशाची काळजी आम्ही घेऊ -- तुझं टेन्शन गेलं आता ! आणि हो, इथं तुझ्याबरोबर राह्यला आणखी कुणाला आणायचं असेल तर सांग ! त्यालाही परवानगी आहे !

पालव : तुमची कमाई आता शून्य का असेना पण पैशाची चिंता करायची नाही ! कुछ भी माँगो !

सुदाम : आणि खटला कसला?

प्रेसिडेंट : तू कशाला विचार करतोस त्याचा? ते सगळं आता आमच्यावर सोड ! आणि गडबड काय आहे ! आम्हालाही सगळे पुरावे, कागदपत्रं तयार करायला जरा वेळ लागणारच आहे ! आणि तुझी कादंबरीही पूर्ण होऊ दे ना ! मनुष्य जातीच्या एका एका टप्प्यावर जगण्याचं ज्ञान देणारी काही निवडक पुस्तकं लिहिली जाणं कधीही चांगलंच !

पालव : किंवा प्रेसिडेंट -- कसं जगू नये याचं ज्ञान देणारी !?

प्रेसिडेंट : दोन्ही एकच ते ! पुस्तकांनी फरकच पडत नाही ! ( हसतात --) पण खपतात खूप काही काही पुस्तकं ! सुदाम विल बी अ बेस्टसेलर !

पालव : बरं तेही एक सांगू का प्रेसिडेंट? आपण काल ठरवलं ते?

प्रेसिडेंट : काय ते? सांगा नं !

पालव : आता यांच्या देशात मात्र, जर का यांचे पाठीराखे कुणी सापडले तर मात्र हालहाल करून मारलं जाईल त्यांना ! आता आपल्याला सहन होणार नाही !

प्रेसिडेंट : हं ते होय? हा बुध्दिमान माणूस आहे ! आपण न सांगताही त्याला हे कळू शकतं ! ( क्षणभरानं -- ) बरं, सुदाम, अजून काही बोलायचं आहे?

सुदाम : नाही --

पालव : ( सुदामला -- ) चला मग -- ( ते दोघे जातात. नंतर प्रेसिडेंट जातात. आता पंतप्रधान आणि जयवंत येतात. काही क्षण शांतता. )

जयवंत : माकड तपासल्यासारखं तपासत होते त्याला ! तोंड उघड म्हटल की उघडत होता तो !

पंत : नकळत बॉम्बहल्ल्यात मरणं किंवा हे असं सापडणं यांपैकी एक घडणारच होतं --

जयवंत : आता इराकच्या पुनरुज्जीवनाचे विषय आहेत !

पंत : आधी तिथं ताटाखालच्या मांजरांची लोकशाही येईल ! -- निरनिराळया लोकांशी, देशांशी आपण चर्चा करत राहू -- काय करायचं ते नंतर ठरवू !

जयवंत : नुसतंच आपल्याला अमुक एक बरोबर वाटतंय म्हणून तसं वागायला आपण काही बेजबाबदार लोक नाही ! ( क्षणभरानं -- ) बरं पण याचा आपल्यावर काय एकूण परिणाम?

पंत : माणसाच्या जगण्यात आर्थिक प्रश्नांचं स्थान केंद्रस्थानी नाही हे आपल्यालाच काय खूप लोकांना कळायला लागलं आहे -- म्हणूनच तर आपण अयोध्येचा प्रश्न केंद्रस्थानी घेतला !

जयवंत : तेही आता तसंच चालु ठेवणं चुकणारच आहे !

पंत : संधी मिळेल तेव्हा आणि मिळाली तर अंमलात आणायला हिंदुत्वाचा मुद्दा डोक्यात ठेवायचाच आहे ! पण पुन्हा आता आर्थिक प्रश्नच केंद्रस्थानी असून देशाचा आर्थिक विकासच महत्त्वाचा कसा आहे याच्यावरच भर देणं बरोबर होईल --

जयवंत : मार्क्सिस्ट लोकांसारखं ?

पंत : नाही, आपल्या पध्दतीनं ! दुसरं काही करणं शक्यच नाहीय ! जागतिकीकरण जोर पकडतंय ! भावनिक प्रक्षोभाचं आता काही नको. दंगली भडकल्या तर परकीय गुंतवणूक येणार नाही आणि जागतिकीकरण फेल होईल !

जयवंत : म्हणजे प्रेसिडेंटचीच आपल्याला अनुकूल केलेली आवृत्ती ? हिंदुत्ववादी, समावेशक, जागतिकीकरणवादी पण गरीबकेंद्रित भांडवलवाद ?

पंत : करेक्ट !

जयवंत : बघू, जमलं तर आपणही होऊ सुपर-पॉवर !

पंत : हो--ऊ--च !

( गावकर, गायकर येतात. )

गावकर : मग कुणीही आमच्या नादी लागू शकणार नाही !

गायकर : राख करून टाकू !

गावकर : मग चांगलं जगणं म्हणजे काय ते आपणच ठरवू !

गायकर : आपणच होऊ जगाची काळजी घेण्याची जबाबदारी पेलणारे !

गावकर : सम्राट !

गायकर : सम्राट !

( पडदा पडत जातो ... )

**-- समाप्त --**

**सूचना :-- सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.**


पत्ता :-- चं. प्र. देशपांडे,

३, स्नेहदीप अपा.,

चिंतामणीनगर,

सहकारनगर नं. २, पर्वती,

पुणे -- ४११००९.

दूरध्वनी -- २४२२७८४७. / २४२२७८४८. / ९३७१००५७७३.